SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगीन्ज टॉप, बरमुडा... | थर्मल, जर्किन स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
जरीवाला ▸ कापड बाजार, फोन नं. 7666510765 ▸ यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर. ▸ सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505



रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १५.०६.२०२६ | अंक नं. ०६४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020











# ‘कुमकुम भाग्य’ फेम अहिल्यानगरची अभिनेत्री संचिता उगलेची आत्महत्या



मुंबई – मुळची अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेरची रहिवासी असलेली छोट्या पडद्यावरील अभिनेत्री संचिता उगले (वय ३०) हिने साडीने गळफास घेत आपले आयुष्य संपवले आहे. विक्की कौशल याच्या गाजलेल्या ‘छावा’ सिनेमात तिने तारा राणी यांचा रोल साकारला होता.

प्राथमिक माहितीनुसार, संचिता मुंबईजवळील नालासोपारा परिसरातील अचोले पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहत होती. १४ जून रोजी संध्याकाळी ६:३० ते ७ च्या सुमारास तिने राहत्या घरी साडीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. संचिताने एवढे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळी कोणतीही सुसाईड नोट (चिठ्ठी) सापडलेली नाही. या प्रकरणाचा सखोल तपास पोलीस करत असून, संचिताच्या कुटुंबीयांची आणि जवळच्या मित्रांची चौकशी केली जाण्याची शक्यता आहे. तिच्या या आत्महत्येमागे व्यावसायिक ताणतणाव होता की काही वैयक्तिक कारण, याचा शोध आता पोलीस घेत आहेत.

एक तरुण आणि आश्वासक अभिनेत्री म्हणून संचिता उगले हिने सिनेसृष्टीत आपले स्थान निर्माण केले होते. तिने अनेक हिंदी मालिका आणि चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या होत्या. कुमकुम भाग्य’, ‘दिलवाली दुल्हा ले जायेगी’ आणि ‘वागळे की दुनिया’ या मालिकेत तिने साकारलेली ‘रुचिता’ ही व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली होती. तसेच तिने ‘सायलेन्स २’ आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या ‘छावा’ सारख्या चित्रपटांमध्येही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या होत्या. याशिवाय ‘रंगबाजी दिलों की’ आणि निर्माती ‘गुल खान’ यांच्या प्रोजेक्ट्समध्येही तिने काम केले होते.

संचिता उगले ही अस्सल मराठमोळी होती. पण हिंदीत तिने आपला चांगला जम बसवला होता. लहानपणी टीव्ही सीरिअल पाहायची. त्यामुळे आपणही अभिनेत्री व्हावे असे तिला वाटायचे. त्यामुळे तिने नगरला नाटकात काम करायला सुरुवात केली होती. छोट्या छोट्या भूमिका ती साकारायची. त्यानंतर तिचे काम पाहून तिला मोठ्या भूमिकाही मिळू लागल्या.

२०२३ नंतर संचिताच्या करिअरने वेग घेतला. तिला ‘कुमकुम भाग्य’मध्ये दीया टंडनची व्यक्तीरेखा साकारायला मिळाली. त्यामुळे तिच्या आयुष्याला टर्निंग पॉइंट मिळाला. त्यानंतर संचिताने मागे वळून पाहिलं नाही. या मालिकेने केवळ मला ओळखच निर्माण करून दिली नाही तर माझ्या आई–वडिलांनाही अभिमान वाटण्याची संधी दिली, असे संचिता नेहमी म्हणायची.


खुशखबर ... खुशखबर ...... खुशखबर .........
जीवन ज्योत मेडिकल फाउंडेशन्स
बॉम्बे इन्स्टिट्युट ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग
शासकीय नोकरीची पात्रता व हमी असलेले कोर्स
प्रवेश देणे चालू आहे
(महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त)
No Donation माफक शुल्क
पात्रता : १० वी / १२ वी / पास–नापास
कालावधी : २ वर्ष
MEDICAL LAB TECHNICIAN (DMLT)
वयाची अट नाही .... त्वरा करा .... मर्यादित जागा .....
महाराष्ट्र शासनाचे Paramedical Council मध्ये रजिस्ट्रेशन करता येते.
शासकीय शिष्यवृत्ती व शैक्षणिक कर्जासाठी मार्गदर्शन
अधिक माहिती व प्रवेशासाठी आजच संपर्क करा
8830685732, 96373 88388
बॉम्बे हॉस्पिटल बिल्डिंग / बेकर्स समोर, वन विभाग कार्यालय मागे, नगर- छ.संभाजीनगर रोड, नविन महानगरपालिका ऑफिस जवळ, अहिल्यानगर




एक अगरबत्तीचा सुवास दरवळेल दूरवर....
प्रिमियम मसाला अगरबत्ती
इंडियन कस्तुरी
इंडियन कस्तुरी म्हणजे असली कस्तुरी
५०ग्रॅम व २५० ग्रॅम मध्ये वजनावर उपलब्ध
रिद्धी सिद्धी सुगंधालय, माळीवाडा
स्टॉ.केवल अगरबत्ती
आडते बाजार, हॉटेल रसरंग समोर, अ.नगर

प्रशिक्षीत व अनुभवी महिला शिक्षक पाहिजे
सह्याद्री प्री स्कूल
सारसनगर, अहिल्यानगर
9689767642












जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## पावभाजी चालकासह त्याच्या भावाला चौघांकडून बेदम मारहाण; गुन्हा दाखल

नगर -स्टेशन रस्त्यावरील उज्वल कॉम्प्लेक्ससमोर एका पावभाजी चालकाला आणि त्याच्या भावाला बेदम मारहाण केल्याची घटना १४ जून रोजी सायंकाळी ५.१५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. पावभाजीचे पार्सल न दिल्याच्या कारणावरून हा वाद झाला. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अलीम जाफर शेख (रा.समर्थनगर, बुरुडगाव रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे पावभाजीचे दुकान आहे. १४ जून रोजी सायंकाळी सव्वापाच वाजेच्या सुमारास उज्वल कॉम्प्लेक्समधील नीलिमा एंटरप्रायजेस येथे काम करणारा एक ओळखीचा व्यक्ती त्याच्या तीन ते चार अनोळखी साथीदारांसह अलीम यांच्या हातगाडीवर आला. त्यांनी अलीम यांच्याकडे पावभाजीचे पार्सल मागितले. काही कारणास्तव पार्सल न मिळाल्यामुळे या सर्वांना प्रचंड राग आला. त्यावरून संशयित आरोपींनी अलीम शेख आणि त्यांचा भाऊ अनिस यांना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्याने या सर्वांनी दोन्ही भावांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता, त्या टोळक्यातील एका आरोपीने थेट हातगाडीवरील पाव गरम करण्याचा लोखंडी तवा उचलला आणि तो अनिस यांच्या डोक्यात जोरात मारला. या हल्लयात अनिस गंभीर जखमी झाले आहेत.

घटनेनंतर अलीम शेख यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे तपास करत आहेत.

# भारतीय शेअर बाजारात विक्रमी तेजी

**सेन्सेक्सची तब्बल ११४० अंकांची उसळी; निफ्टीत ३६० अंकांची वाढ**

मुंबई - गेल्या चार महिन्यांपासून जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण करणारा अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष आता थांबणार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांमध्ये शांतता करार झाल्याची अधिकृत घोषणा केली आहे. या निर्णयामुळे जागतिक बाजारांमध्ये उत्साहाची लाट उसळली असून, १५ जून रोजी आठवड्याच्या पहिल्याच दिवशी भारतीय शेअर बाजाराने दमदार उसळी घेतली. बाजार उघडताच सेन्सेक्सने तब्बल ११४० अंकांची मोठी झेप घेत ७६ हजार ६६८ चा टप्पा गाठला. गॅपअप सुरुवात झाल्यानंतर काहीसा खाली येवून भारतीय बाजार स्थिरावला.

शांतता कराराच्या बातमीने भारतीय शेअर बाजारातही सकारात्मक परिणाम दिसून आले. सोमवारी सकाळी ९.१५ वाजता बाजार उघडताच मुंबई शेअर बाजाराचा (बीएसई) सेन्सेक्स तब्बल १,१९७ अंकांच्या उसळीसह ७६,७२७.६५ च्या पातळीवर पोहोचला. त्याचप्रमाणे, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा (एनएसई) निफ्टी-५० निर्देशांक ३५९.३० अंकांच्या वाढीसह २३,९०० च्या पार गेल्याने गुंतवणूकदारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. केवळ मुख्य निर्देशांकच नव्हे, तर विस्तृत बाजारातही उत्साह दिसून आला. निफ्टी मिडकॅप १.४ टक्के आणि निफ्टी स्मॉलकॅप १.७ टक्क्यांच्या वाढीसह व्यवहार करत होते. या तेजीमध्ये रिअल्टी आणि ऑटो क्षेत्राचा वाटा मोठा आहे. निफ्टी रिअल्टीमध्ये २.७५ टक्क्यांची, तर ऑटो क्षेत्रात १.९४ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली. याशिवाय फायनान्शिअल सर्व्हिसेस, पीएसयू बँक आणि खाजगी बँकेच्या शेअर्समध्येही मोठी खरेदी दिसून आली.

१५ मे रोजी सकाळी ओपनिंग सत्रात इंडिगो, बजाज फायनान्स, अल्ट्राटेक सिमेंट, इटरनल, एल अँड टी, बजाज फिनसर्व्ह, एशियन पेंट्स, मारुती सुझुकी आणि एचडीएफसी बँक यांसारख्या प्रमुख शेअर्सनी बाजाराला आधार दिला. दुसरीकडे, सेन्सेक्समधील भारती एअरटेल आणि सन फार्मा हे दोन शेअर्स मात्र घसरणीसह व्यवहार करत होते.

येत्या १९ जून रोजी स्वित्झर्लंडमध्ये या शांतता करारावर स्वाक्षरी होणार असून, त्यानंतर जागतिक राजकारण आणि अर्थकारणाला नवी दिशा मिळणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

### कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण

अमेरिका आणि इराण युद्ध थांबवण्यास आणि होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यास सहमत झाले आहेत. या निर्णयामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत ४ टक्क्यांहून अधिक मोठी घसरण झाली आहे. क्रूड ऑइलचे भाव ९० डॉलर प्रति बॅरलच्या खाली आल्याने जगभरातील महागाईचा दबाव कमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एमसीएक्सवर क्रूड ऑइलमध्ये ४८० अंकाची मोठी घसरण पहायला मिळाली. दुपारी एमसीएक्सवर क्रूड ऑइलमध्ये तब्बल ६ टक्क्यांहून अधिक घसरण नोंदवली गेली होती.

## सोन्याची झळाळी पुन्हा वाढली; ४ दिवसांत ६० हजारांनी वाढले दर

मुंबई - गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या भावात सातत्याने चढ-उतार सुरु होते. मात्र, आता सलग चौथ्या दिवशी सोन्याचे दर वधारले आहे. जूनच्या सुरुवातीला काही काळ स्वस्त झालेले सोने आता पुन्हा महागले आहे. मागच्या ४ दिवसांत सोनं प्रति तोळा ६ हजार रुपयांनी तर प्रति १०० ग्रॅम तब्बल ६० हजारांनी महागलं आहे. १५ मे रोजी सोन्याच्या दरात २५०० रुपयांनी वाढ झाली आहे.

जागतिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सोन्याच्या दरात मोठी वाढ होत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. मात्र, वाढती महागाई आणि सोन्याच्या किमतीत झालेली ही मोठी वाढ यामुळे सर्वसामान्य ग्राहक अडचणीत सापडला आहे. मुंबईत १५ मे रोजी २२ कॅरेट सोने प्रति तोळा १ लाख ६० हजार २३५ रुपये, तर १८ कॅरेट सोने १ लाख ३१ हजार १०७ रुपयांपर्यंत पोहोचले आहे. राजधानी दिल्लीतही सोन्याचे दर उच्चांकी पातळीवर असून, तिथे २४ कॅरेट सोन्याचा भाव १ लाख ५१ हजार ६८० रुपये प्रति १० ग्रॅम इतका नोंदवला गेला आहे.

केवळ सोनेच नव्हे, तर चांदीच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. चांदीचा भाव आज ५ हजार रुपयांनी वधारून प्रति किलो २ लाख ६५ हजार रुपयांवर पोहोचला आहे. कमोडिटी बाजारात (एम सीएक्स) सोने १ लाख ५३ हजार २०० रुपये, तर चांदी २ लाख ५२ हजार ४०० रुपयांवर व्यवहार करत आहे.

जागतिक घडामोडींचा परिणाम सोन्याच्या भावावर झाला आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता कराराची बातमी आल्यानंतर कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण झाली. यामुळे गुंतवणूकदारांनी पुन्हा एकदा सोन्या-चांदीमध्ये सुरक्षित गुंतवणूक करण्यास प्राधान्य दिले आहे, परिणामी सोन्याच्या किमती वधारल्या आहेत. जरी सध्या सोने महागले असले, तरी मागील उच्चांकी दराच्या तुलनेत ते अजूनही सुमारे २९ हजार रुपयांनी स्वस्त असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.


### लखन मिसाळ यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सोनेगाव, जामखेड येथील रहिवासी लखन बबनराव मिसाळ (वय ३२) यांचे अल्प आजाराने निधन झाले. १५ जून रोजी सोनेगाव येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, १ भाऊ, पत्नी, १ मुलगी असा परिवार आहे. अभिजित बबन मिसाळ यांचे ते बंधू होत.

### सोपानराव वालेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - विनायकनगर येथील रहिवासी सोपानराव रामा वालेकर (वय ८६) यांचे १३ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दिनेश, मोहन वालेकर, लता बाबासाहेब बेरड यांचे ते वडील होत.

## पाणी तुंबण्याची समस्या टाळण्यासाठी महापालिकेकडून शहरात विविध पाच ठिकाणी नाले स्वच्छतेची मोहिम सुरु

नगर - नाल्यांमध्ये कचरा साचून पावसाळ्यात नाले तुंबण्याचे प्रमाण मोठ्या वाढते. साचलेल्या कचऱ्यामुळे पाणी तुंबण्याची समस्या टाळण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेतर्फे दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई मोहीम हाती घेण्यात येते. या वर्षी उन्हाळ्यात शहरातील मोठ्या नाल्यांची सफाई पूर्ण करण्यात आली होती. आता उर्वरित नालेसफाई सुरु करण्यात आली आहे. यामध्ये शहरातील विविध ठिकाणच्या ५ नाल्यांमधील कचरा, गाळ, झुडूपे काढून नाले स्वच्छ केले जात आहेत.

सध्या शहराच्या विविध भागांत नालेसफाईला प्राधान्य देण्यात आले आहे. यात जिल्हाधिकारी कार्यालयामागील बालाजी कॉलनीतील मोठ्या नाल्याचा समावेश आहे. हा नाला मिस्कीन मळा, सिव्हिल हडको, महावीर नगर आणि गंधे मळा मार्गे थेट सीना नदीला जाऊन मिळतो. या नाल्यातील गाळ, कचरा, झुडूपे अडथळे काढण्याचे काम सुरू आहे.



शहरातील वारुळाचा मारुती परिसरात सीना नदीची स्वच्छता करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे, केडगाव-सोनेवाडी रोड परिसरातील नाल्याचीही स्वच्छता मोहिम हाती घेतली आहे. हा नाला केडगाव अमरधाम परिसरातून पुढे जावून सीना नदीला मिळतो. त्याचीही स्वच्छता मोहिम सुरु असल्याचे सांगण्यात आले. याव्यतिरिक्त, नागापूर पूल परिसरात सीना नदीपात्रातील स्वच्छता आणि वारुळाचा मारुती येथील सीना नदीतील जलपर्णी काढण्याचे काम सुरू आहे.

महापालिकेचे विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, अभियंता सुरेश इथापे, क्षेत्रीय अधिकारी रिझवान शेख आणि क्षेत्रीय अधिकारी मयूर मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्वच्छता मोहिम सुरु आहे.

शहरातील अनेक नागरिक घरातील कचरा नाल्यांमध्ये आणून टाकतात. त्यामुळे पावसाळ्यातील नदीला पाणी आल्यानंतर हे नाले तुंबून शहरातील सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचते. त्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. नागरिकांनी घरातील कचरा, प्लास्टिक हे इतरत्र न टाकता. घंटागाडीत टाकावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

### सुभद्राबाई फलके यांचे दु:खद निधन




नगर - यशवंत कॉलनी येथील रहिवासी सुभद्राबाई शरदचंद्र फलके (सुभद्रा वहिनी, वय ८०) यांचे १४ जून रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. न्यायमूर्ती उर्मिला फलके व इंजि. मयुर फलके यांच्या त्या मातोश्री होत.

### राजाबाई जाधव पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बुरुडगाव येथील रहिवासी राजाबाई पोपटराव जाधव पाटील (वय ८०) यांचे १४ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुरुडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### आशाबाई रोडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - एकवीरा चौक, पाईपलाईन रोड येथील रहिवासी आशाबाई देवराम रोडे (वय ५९) यांचे १४ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे भाऊ, भावजय, २ भाचे, १ भाची असा परिवार आहे. गोरख रोडे यांच्या त्या बहिण तर शशांक रोडे यांच्या आत्या होत.

### निवृत्त मुख्याध्यापिका सौ. शोभा उदावंत यांचे निधन



नगर - केडगाव जिल्हा परिषद शाळेच्या निवृत्त मुख्याध्यापिका सौ. शोभा उदावंत (वय ७३, हल्ली राहणार, पुणे) यांचे १४ जून रोजी पहाटे ४ वाजता वाकड येथे लाईफपॉइंट हॉस्पिटलमध्ये दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे देहदान करण्यात आले. त्यामुळे पुढील कोणतेही धार्मिक विधी होणार नाहीत. जिल्हा परिषदेचे निवृत्त ट्रेजरी ऑफीसर अच्युत उदावंत यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

### सौ.सरला सोमाणी यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील सौ.सरला सोमाणी (वय ७०) यांचे अल्पश: आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गुरुमाऊली पतसंस्थेचे चेअरमन व बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे सचिव शरद रामविलास सोमाणी यांच्या पत्नी, प्रेमसुख, डॉ.मदन सोमाणी व प्रकाश सोमाणी यांच्या भावजई, फिजिओथेरपिस्ट डॉ.विजय सोमाणी यांच्या मातोश्री, डॉ.आशिष सोमाणी, अमित, अतुल व उमेश सोमाणी यांच्या चुलती होत.



इलेक्ट्रिक वायर चोरी करणाऱ्या दोघांना पकडल्यानंतर त्याच्या समवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

## बांधकामाच्या साईटवरून इलेक्ट्रिक वायर चोरणाऱ्या दोघांना अटक

नगर - बांधकामाधीन इमारतीतून इलेक्ट्रिक वायरची चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना तोफखाना पोलिसांनी गजाआड केले आहे. या कारवाईत पोलिसांनी १०,००० रुपये किमतीची इलेक्ट्रिक वायर जप्त केली आहे.

तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये ३० मे रोजी अज्ञात इसमांविरुद्ध इलेक्ट्रिक वायर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना, पेट्रोलिंगदरम्यान मिळालेली गुप्त माहिती आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी करण मनोज पवार (वय ३१, रा. संजय नगर, कोपरगाव) आणि ऋत्विक सुनील पवार (वय २०, रा. सोनई) या दोघांना ताब्यात घेतले.

सुरुवातीला या दोघांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली, मात्र पोलिसांनी खाक्या दाखवताच त्यांनी चोरीची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरी केलेली १० हजार रुपये किमतीची इलेक्ट्रिक वायर जप्त करण्यात आली असून, पुढील तपास म.पो.हे.कॉ. संजीवनी नेटके करत आहेत.

ही कारवाई पो.नि. बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोलिस अंमलदार अरुण गांगुर्डे, भानुदास खेडकर, अब्दुलकादर इनामदार, सुधीर खाडे, सुरज वाबळे, सुमित गवळी, अविनाश बर्डे, सतिश त्रिभुवन, सुजय हिवाळे, भागवत बांगर, सतिश शिंदे, शाकीर सय्यद, बाळासाहेब भापसे, कपिल गायकवाड, राहुल गुंडू, नितीन शिंदे, अरुण सांगळे, महिला पो.ना. जिजाबाई खुडे यांच्या पथकाने केली.

## फोटो काढल्याच्या संशयावरून तरुणांवर कोयत्याने जीवघेणा हल्ला

**ऐतिहासिक फऱ्याबाग येथील घटना, तीन अनोळखी आरोपींवर गुन्हा दाखल**

नगर - शहरातील ऐतिहासिक फऱ्याबाग परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या तरुणांवर तीन अनोळखी व्यक्तींनी कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना १४ जून रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या हल्लयात २ जण जखमी झाले आहेत.

याबाबत रेहान असिफ खान (वय १७, रा. कामाठीपुरा, झेंडीगेट) याने भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी रेहान आपल्या मित्रांसह फऱ्याबाग येथे फिरण्यासाठी गेला होता. त्या ठिकाणी तीन अनोळखी तरुण दारू पीत बसले होते. आपण दारू पीत असताना रेहान आणि त्याचे मित्र आपले फोटो काढत आहेत, असा गैरसमज या तीन अनोळखी आरोपींनी करून घेतला. याच कारणावरून आरोपींनी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यांनी रेहान आणि त्याच्या मित्रांना अत्यंत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. हा वाद एवढ्या विकोपाला गेला की, आरोपींनी जीवे मारण्याच्या उद्देशाने उमर खान या तरुणाच्या डोक्यावर आणि फैजअली तांबोळी याच्या डाव्या हाताच्या पंजावर लोखंडी कोयत्याने गंभीर वार केले. या हल्लयात दोघेही तरुण गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेनंतर रेहान खान याने कॅम्प पोलीस स्टेशन, भिंगार येथे आरोपींविरोधात तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी तीन अनोळखी आरोपींविरुद्ध खुनाचा प्रयत्न आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांनी घटनास्थळी भेट दिली.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पवार करत असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

# कांदा चाळीत लपवलेला गुटखा व पान मसाल्याचा मोठा साठा जप्त

**दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल, पकडलेल्या साठ्या बाबत संशय कल्लोळ**

नगर - स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीगोंदा तालुक्यातील चोराचीवाडी येथे छापा टाकून प्रतिबंधित पानमसाला व गुटख्याचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी रवी बबन दळवी (वय ४०, रा. रोकडोबा चाक, श्रीगोंदा) याने विक्रीच्या उद्देशाने प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याचा साठा केला होता. हा साठा लपवण्यासाठी अमोल भिमराव लांडगे (रा. चोराचीवाडी, ता. श्रीगोंदा) याने आपल्या शेतातील कांदा चाळ उपलब्ध करून दिली होती. ही गोपनीय माहिती मिळाल्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १४ जून रोजी सायंकाळी चोराचीवाडी येथील कांदा चाळीवर छापा टाकला असता, तिथे ३ लाख ७० हजार ५५२ रुपये किमतीचा प्रतिबंधित विमल गुटखा व पानमसाला मिळून आला. पोलिसांनी हा सर्व मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी दोघांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७४, २७५ आणि अन्नसुरक्षा मानके कायदा २००६ चे कलम ५९ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### जप्त केलेला गुटखा संशयाच्या भोवऱ्यात

नूतन पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार बेलवंडी पोलिसांनी श्रीगोंदा हद्दीत मोठी कारवाई केली होती. या कारवाईत पोलिसांनी तब्बल २६ लाख ४० हजार २९६ रुपयांचा गुटखा, पानमसाला, सुगंधी तंबाखू आणि वाहने जप्त केली होती. हा सर्व मुद्देमाल आणि गुन्हा क्रमांक ०४६३/२०२६ पुढील तपासासाठी श्रीगोंदा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला होता. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अहिरे यांच्याकडे सोपवण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चोराची वाडी येथे कारवाई करत अवैध गुटखा जप्त केला. या छाप्यात पकडलेल्या मालाची पोलिसांनी जेव्हा बारकाईने पडताळणी केली, तेव्हा अधिकारी चक्रावून गेले. जप्त केलेल्या काही पोत्यांवर बेलवंडी पोलिसांनी दाखल केलेल्या आधीच्या गुन्ह्याचा क्रमांक स्पष्टपणे लिहिलेला आढळून आला. गुन्हे शाखेच्या पथकाने अधिक सखोल तपास केला असता, हा मुद्देमाल श्रीगोंदा पोलीस ठाण्यातूनच बाहेर काढून विकल्याचे निदर्शनास आले.

या गंभीर प्रकारामुळे पोलीस ठाण्यात जप्त केलेला इतर सर्व मुद्देमाल सुरक्षित आहे का, असा मोठा प्रश्न आता उपस्थित होत आहे. या प्रकरणात काही वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. जप्त मालाचा ताबा, सरकारी नोंदी आणि साठवणुकीची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

## क्रिकेट सामन्यातील वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला

**बॅट आणि स्टम्पने मारहाण, चौघा जणांवर गुन्हा दाखल**

नगर - शहरातील न्यू आर्ट्स कॉलेजच्या मैदानावर क्रिकेट सामन्यादरम्यान झालेल्या किरकोळ वादातून एका तरुणावर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना १२ जून रोजी सकाळी ८.३० च्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी चार आरोपींविरुद्ध १४ जून रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत यथार्थ कल्पेश परदेशी (रा.विद्या विहार कॉलनी, दिल्लीगेट) याने फिर्याद दिली आहे. यथार्थ हा आपल्या मित्रासोबत न्यू आर्ट्स कॉलेजच्या मैदानावर क्रिकेट खेळण्यासाठी गेला होता. भवानी टायगर्स आणि हरिहरेश्वर किंग्स या दोन संघांमध्ये सामना सुरू असताना एका चेंडूवरून खेळाडूंमध्ये जोरदार वाद झाला. सामना संपल्यानंतर वाद मिटवण्याच्या बहाण्याने आरोपींनी यथार्थला कॉलेजच्या मुख्य गेटवर बोलावून घेतले.

तेथे दबा धरून बसलेल्या कुणाल घेगडे याने यथार्थच्या जबड्यावर क्रिकेटच्या बॅटने जोरदार प्रहार केला. त्यानंतर सोहम बिंगी याने स्टम्पने त्याच्या हातावर आणि खांद्यावर गंभीर मारहाण केली, तसेच जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. सोबत असलेल्या ओम घेगडे आणि हर्ष देवळालीकर यांनी यथार्थला जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. हा सर्व प्रकार पाहून मित्र मदतीला धावून आले असता सर्व आरोपी दुचाकीवरून पळून गेले.

जखमी यथार्थला तातडीने साईदीप हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. याप्रकरणी पोलिसांनी कुणाल घेगडे, ओम घेगडे, सोहम बिंगी आणि हर्ष देवळालीकर यांच्याविरुद्ध मारहाण आणि जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदवला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# संविधानिक संस्थांचा गैरवापर करून भाजपने लोकशाही धोक्यात आणली

## कॉ. डॉ. राम बाहेती यांची टिका; भाकप जिल्हा कौन्सिल बैठकीत केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर हल्लाबोल, पदयात्रा, जनसंवाद आणि मनरेगा बचाव मोहिमेची घोषणा

नगर – भाजप आपली केंद्रातील आणि राज्यातील सत्ता कायम राखण्यासाठी सीबीआय, आरबीआय, निवडणूक आयोग, न्यायव्यवस्था आणि इतर संविधानिक संस्थांचा गैरवापर करत आहे. त्यामुळे देशाची राज्यघटना आणि लोकशाही धोक्यात आली असल्याची घणाघाती टीका भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य कॉ. डॉ. राम बाहेती यांनी केली.



बुरुडगाव रोड येथील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात जिल्हा कौन्सिलची सदस्य बैठकीत बोलताना कॉ. डॉ. राम बाहेती.

शहरातील बुरुडगाव रोड येथील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात जिल्हा कौन्सिलची सदस्य बैठक पार पडली. कॉ. आप्पासाहेब वाबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत भाकपचे राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे, जिल्हा सहसचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. संतोष खोडदे, कॉ. संदीप इथापे यांच्यासह ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते श्रीधर अधिक, धोंडीभाऊ सातपुते, प्रताप सहाणे, दशरथ हासे, रघुनाथ पवार, नारायण मेमाले, अर्जुन खैरे, भारत आरगडे, भारती न्यालपेल्ली, संगीता कोंडा, सुलाबाई आदमाने, ज्ञानदेव गायकवाड, लक्ष्मण नवले, सुनील दुधाडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे कॉ. डॉ. राम बाहेती म्हणाले की, देशातील विविध राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये भाजपच्या जागा कमी झाल्या असल्या तरी मतांची टक्केवारी कमी झालेली नाही. इंडिया आघाडीत काम करताना भाजपविरोधी भूमिका घेतली जात असून, लोकशाहीचे संरक्षण करण्यासाठी विद्यमान सरकार सत्तेतून जाणे आवश्यक आहे. सत्तेची समीकरणे जुळविताना अनेक राजकीय पक्ष भाजपसोबत गेले, मात्र भारतीय कम्युनिस्ट पक्षाने कधीही भाजपसोबत जाण्याची भूमिका घेतलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

मतदार यादीच्या पुनर्तपासणीच्या नावाखाली पश्चिम बंगालमध्ये सुमारे ९० लाख मतदारांची नावे वगळण्यात आली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. निवडणूक आयोग सरकारच्या दबावाखाली काम करत असल्याचा दावा करत त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप सरकारचे धाडस वाढले असून बहुजन समाजाच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकारण केले जात असल्याचा आरोप केला.

राजकीय परिस्थितीचा आढावा घेताना त्यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा संदर्भ दिला. त्यांना पराभवाचा सामना करावा लागला, त्यांच्या पक्षातील अनेक खासदार आणि आमदार पक्ष सोडून गेले. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या संदर्भातील प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देण्यास विलंब केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबतीतही अशाच प्रकारच्या घडामोडी झाल्या असून ममता बॅनर्जी यांच्या बाबतीतही तशाच प्रकारची परिस्थिती निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच तामिळनाडू, आसाम आणि पाँडिचेरी या राज्यांतील राजकीय घडामोडींचाही त्यांनी सविस्तर आढावा घेतला.

दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय कौन्सिल बैठकीतील चर्चेची माहिती देताना डॉ. बाहेती म्हणाले की, पक्षाच्या वाटचालीत काय चुका झाल्या याचे सखोल विश्लेषण केल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. सध्या जनतेचे मूलभूत प्रश्न राजकीय चर्चेच्या केंद्रबिंदूपासून दूर फेकले जात आहेत. हे प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणण्याचे काम भारतीय कम्युनिस्ट पक्ष करत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांनी राज्य सरकारने कोणत्याही अटी–शर्तींशिवाय शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून त्यांचा सातबारा कोरा करावा, अशी मागणी केली. तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या जनविरोधी धोरणांविरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने ६ ते १५ ऑगस्ट या कालावधीत जिल्हाभर गावोगावी पदयात्रा काढण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

नागरी समस्यांबाबत विशेष मोहीम राबविण्यात येणार असून जुलै आणि ऑगस्ट महिन्यात भाकप जनतेच्या दारी संवाद घरोघरी हा व्यापक जनसंपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच ऑगस्ट महिन्यात पक्ष शाखा सचिवांचे जिल्हास्तरीय शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

बैठकीत नीट परीक्षा पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर पुनर्परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने मोफत निवास व प्रवास व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी महत्त्वपूर्ण मागणी करण्यात आली. याशिवाय मनरेगा वाचवा या अभियानांतर्गत १५ ते ३० जून या कालावधीत लाल बावटा शेतमजूर संघटनेच्या वतीने जिल्हाभर विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याची घोषणाही करण्यात आली. बैठकीत लोकशाही, संविधान, शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. आगामी काळात जनतेचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी आणि संघटनात्मक बळकटीसाठी विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## 'जगाचे नंदनवन व्हावे'

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




पुण्य गाठी बांधा, म्हणजे टळेल दुःखाची बाधा. पण पुण्य कसे साधावे ?

'रात्रंदिन असो आम्हा हा ध्यास. लोकांना व्हावे प्रिय, हीच मनी आस. राहावे आनंदी सर्वांनी. परक्यांचेही प्रेममनी. कल्याण होवो प्राणिमात्रांचे. भयभीत कुणीही नसो साचे. ना शरीरी रोग, ना मनी राग, जो लावील जिवाला आग. सगळे आपले दोस्त. आनंदात राहावेत मस्त. सर्वांच्या सुखासाठी करावी शिकस्त. जातिजातीत सामंजस्य नांदावे. परस्परांशी जिव्हाळ्याने वागावे. एकमेकां साह्य करावे, जेणे जगाचे नंदनवन व्हावे.'

हे सर्व जगाचे गाणे. इथे केवळ व्यक्तीसाठी काही न मागणे. सर्वांना सुख लाभणे. ऐसे आपले वागणे. हे आमच्या संस्कृतीचे लेणे. ज्ञानेश्वर माऊलींनी पसायदानात तरी दुसरे काय मागितले? मागितले तेही विश्वासाठी.

सर्व प्राणिमात्रांना हवे ते मिळो. पण त्यापूर्वी प्राणिमात्रांना हे कळो, की खळांची व्यंकटी सांडो. दुष्टांचे कुटिल डाव हाणून पडोत.

प्राणिमात्रांना परस्परांबद्दल आत्यंतिक प्रेम वाटो. ते इतरांचे कल्याण साधणाऱ्याच कार्यात मग्न होवोत. असे झाले, तर वाईट वासनांचे अस्तित्वच कुठले? इच्छा होतील आणि त्या पूर्णत्वास जातील. त्यामागे प्राणिमात्रांच्या भल्यासाठीच आग्रह राहील.

परमेश्वराला ही संस्कृती करते प्रार्थना. की प्रयत्न व्यर्थ ना जावात. घडो परोपकार सदा. सर्वांच्या दुःखावर गदा. हरोत सर्वांच्या आपदा.

कलाकौशल्य व कारागिरी पडावी पदरी. उपजिविकेचे जे साधन करी. ती भांडणे नकोच. शस्त्रांचा व्हावा संकोच. सामंजस्याने वाद संपोत. ज्ञान मिळावे ऐसे, की ज्यामुळे जगात नावलौकिक दिसे. अशी धन्यतेची पावती लाभे, अशी मानवतावादी परोपकारी प्रवृत्ती चित्ती उपजता, कळीकाळाची भीती वाटेल कशी ?

अलेक्झांडर भारतात आला होता, तेव्हाची गोष्ट. येथील जीवनपद्धतीचा त्याला मोह पडला. भारतीय तत्त्वज्ञानाचा मनावर होणारा प्रभाव त्याला हवाहवासा वाटला. आपल्या देशात असे प्रभाव पाडणारे तत्त्वज्ञान न्यावे म्हणून त्याने एका ऋषीला त्याच्या देशात चलण्याचा आग्रह केला. ऋषीने नाकारले. अलेक्झांडरने शस्त्र उपसले. 'चलतोस की नाही माझ्याबरोबर माझ्या देशात? नाहीतर उडवीन तुझे मस्तक. '

ऋषी हसला. म्हणाला, 'ते शक्य नाही. मला मारणे कुणाही मदोन्मत्त, आसुरी प्रवृत्तीच्या पुरुषाला शक्य नाही. '

अलेक्झांडर गोंधळला. सगळे जग त्याला घाबरत होते. चळचळा कापत होते आणि हा म्हणतो की, हे अशक्य! अलेक्झांडर त्याच्याकडे धावला आणि तलवारीचा वार करायला सरसावला.

ऋषी तरीही निश्चल. निर्भय. उलट म्हणाला, 'मला शस्त्र मारू शकत नाही. मला अग्नी जाळू शकत नाही. वारा शोषण करू शकत नाही, पाणी नेऊ शकत नाही.' वाहून अलेक्झांडरच्या हातची तलवार गळून पडली.

– किशोर गांधी

# ग्रामीण भाग समृद्ध आणि दुष्काळमुक्त करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि ऐक्याची गरज

## चित्रपट निर्माती व दिग्दर्शिका श्रीमती किरण राव

नगर – महाराष्ट्राची भूमी दुष्काळमुक्त करण्यासाठी २०१६ साली पाणी फाउंडेशनची स्थापना करण्यात आली. पाणी फाउंडेशनच्या उद्देशाला यश येऊन त्याचे लोक चळवळीमध्ये रूपांतर झाले. सोनेवाडी गावातील सुकन्या शेतकरी महिला गटाने अहिल्यानगर तालुक्यामध्ये प्रथम क्रमांकाचे साडेपाच लाख रुपयांचे पारितोषिक जिंकले. याबद्दल 'पाणी फाउंडेशन' या संस्थेच्या संस्थापिका, चित्रपट निर्माती, दिग्दर्शिका किरण राव यांनी महिलांच्या कार्याचे व यशाचे कौतुक करताना आपल्या मनोगतात वरील विचार नमूद केले.

जिद्द, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि ऐक्य याच्या बळावर आपण ग्रामीण भागाला सुजलाम सुफलाम करू शकतो. गांधीजींचा मूलमंत्र खेड्याकडे चला. खेडे समृद्ध करा हा विचार आपण यशस्वी करू शकतो. त्यासाठी ग्रामीण भागातील लोकांनी ऐक्याची भावना ठेवावी. सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत. महिलांनी जे यश मिळवले. त्याचे त्यांनी कौतुक केले. शेती ही विषमुक्त व्हावी. गटशेती करावी. अडथळ्यांवर मात करताना थांबता कामा नये. अशा भावनाही त्यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केल्या.


सोनेवाडी गावातील सुकन्या शेतकरी महिला गटाने अहिल्यानगर तालुक्यामध्ये प्रथम क्रमांकाचे साडेपाच लाख रुपयांचे पारितोषिक मिळाल्याबद्दल 'पाणी फाउंडेशन' या संस्थेच्या संस्थापिका किरण राव यांनी गावास सदिच्छा भेट देवून अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन करण्यात आले तसेच रोपट्याला पाणी घालण्यात आले. पाणी, माती आणि वृक्ष यासाठी काम करणारे फाउंडेशन असल्यामुळे वृक्षाचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्ताविक सुरेश सुंबे यांनी केले. गावचे सरपंच विठ्ठलराव दळवी अध्यक्षस्थानी होते. सुकन्या शेतकरी महिला गटाच्या वतीने आलेल्या पाहुण्यांचे सन्मान करण्यात आले बक्षीस रूपाने मिळालेल्या पैशातून ओढ्याच्या खोलीकरणाच्या कामकाजाचे उद्घाटन किरण राव यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सौ. बेबी सचिन दळवी यांनी गटाच्या वतीने आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला सुकन्या शेतकरी महिला गट, भैरवनाथ शेतकरी गट, जिजाऊ महिला शेतकरी गट, दादास्वामी शेतकरी गट, मगरदरा महिला शेतकरी गट, खोपेश्वर महिला शेतकरी गट, हिरकणी महिला गट तसेच पाणी फाउंडेशन चे जिल्हा समन्वयक श्री. फाटक, श्री. विधाते, माधुरी मॅडम, उमेदचे संदीप साबळे, शिंदे मॅडम, कृषी खात्याचे श्री. जावळे, श्रीमती गोसावी मॅडम उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन आणि सूत्रसंचालन करून हरिश्चंद्र दळवी यांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे आभार श्री. विधाते यांनी व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नंदू दळवी, सचिन दळवी, सतीश दळवी, अर्जुन वारे, शिवाजी सूंबे, अशोक सुंबे, रोहिदास सुंबे, माणिक दळवी, रमेश सुंबे, अशोक ठुबे, रामदास काळे, दिलीप पवार, जय येणारे, श्रीमती अंजनाबाई बोरगे, सुकन्या जिजाऊ, भैरवनाथ शेतकरी गट व ग्रामस्थांनी यांनी प्रयत्न केले.

# अवयवदान जनजागृती पुस्तिकेचे अण्णा हजारे यांच्या हस्ते प्रकाशन

## समाजातील गैरसमज दूर करण्यासाठी फिनिक्स फाऊंडेशनची जनजागृती मोहीम

नगर – समाजामध्ये अवयवदान, नेत्रदान आणि देहदानाबाबत जागरूकता निर्माण करून त्यासंदर्भातील गैरसमज दूर करण्याच्या उद्देशाने फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने अवयवदान जनजागृतीवर आधारित माहितीपूर्ण पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते राळेगणसिद्धी येथे झाले. या उपक्रमामुळे समाजात अवयवदानाविषयी सकारात्मक विचार निर्माण होण्यास आणि अधिकाधिक नागरिक या चळवळीत सहभागी होण्यास प्रोत्साहन मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.


फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी राळेगणसिद्धी येथे अण्णा हजारे यांची भेट घेतली.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी राळेगणसिद्धी येथे जाऊन अण्णा हजारे यांची भेट घेतली. यावेळी फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, तुलसीराम पालीवाल, संजय सांवत, माजी सैनिक रामसिंग रायजी, नाना पठारे उपस्थित होते.

या भेटीदरम्यान फाऊंडेशनच्या माध्यमातून राज्यभर राबविण्यात येणाऱ्या नेत्रदान आणि अवयवदान जनजागृती अभियानाची माहिती त्यांना देण्यात आली. तसेच समाजातील विविध घटकांपर्यंत अवयवदानाचा संदेश पोहोचावा यासाठी तयार करण्यात आलेली माहिती पुस्तिकाची माहिती अण्णा हजारे यांना देण्यात आली. फाऊंडेशनच्या वतीने ही पुस्तिका नागरिकांना मोफत उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यातून अवयवदानाबाबतचे वैज्ञानिक सत्य, कायदेशीर प्रक्रिया आणि सामाजिक महत्त्व यांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविली जाणार आहे. समाजातील गरजू रुग्णांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणारी ही चळवळ भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मानस फाऊंडेशनने व्यक्त केला आहे.

जालिंदर बोरुडे यांनी सांगितले की, देशात आणि राज्यात हजारो रुग्ण विविध अवयवांच्या प्रत्यारोपणासाठी प्रतीक्षा यादीत आहेत. अनेकांचे जीवन हे योग्य वेळी अवयव उपलब्ध होण्यावर अवलंबून आहे. मात्र, अवयवदानासंदर्भात समाजात अजूनही अनेक गैरसमज, भीती आणि चुकीच्या समजुती प्रचलित असल्याने अपेक्षित प्रमाणात अवयवदान होत नाही. हे गैरसमज दूर करण्यासाठी फिनिक्स सोशल फाऊंडेशन सातत्याने जनजागृतीचे काम करत आहे. या चळवळीमुळे अनेक नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प केला असून, काहींनी प्रत्यक्ष नेत्रदान करून अंध व्यक्तींना नवदृष्टी देण्याचे महान कार्य केले आहे.

बोरुडे यांनी पुढे सांगितले की, वैद्यकीय विज्ञानाने मोठी प्रगती केली असली तरी मानवी अवयव कृत्रिमरीत्या निर्माण करणे अद्याप शक्य झालेले नाही. त्यामुळे मरणोत्तर अवयवदान हाच गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. यासाठी नेत्रदान, अवयवदान आणि देहदानाबाबत व्यापक प्रमाणावर जनजागृती होणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने या विषयाकडे सामाजिक जबाबदारी म्हणून पाहिले, तर अनेक रुग्णांना नवजीवन मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

अण्णा हजारे यांनी फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. अवयवदानामुळे अनेक गरजू व्यक्तींना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे हे केवळ दान नसून समाजासाठी केलेले एक महान पुण्यकर्म असल्याचे त्यांनी नमूद केले. अवयवदानाची चळवळ ही समाजाला दिशा आणि प्रेरणा देणारी आहे. आज अनेकजण स्वतःपुरते विचार करतात; मात्र समाजासाठी काहीतरी करण्याची भावना जोपासली पाहिजे. जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून जनतेच्या सेवेसाठी सुरू केलेले हे कार्य अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी अनेकांना नेत्रदानाच्या माध्यमातून नवदृष्टी देण्याचे कार्य केले आहे,

अण्णा हजारे यांनी पुढे सांगितले की, ज्यांना प्रत्यक्ष अवयवाची गरज आहे, त्यांनाच त्याचे महत्त्व आणि किंमत अधिक चांगल्या प्रकारे समजते. अनेक रुग्ण महिनोन्महिने, तर काही वेळा वर्षानुवर्षे अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असतात. अशा गरजूंसाठी समाजाने पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. नेत्रदान, अवयवदान आणि देहदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारून नागरिकांनी या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.


ज्ञानसंपदा शाळेत नशा मुक्ती अभियानांतर्गत, अमली पदार्थ सेवन विरोधी टास्क फोर्स नाशिक यांच्या वतीने इयत्ता, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# अमली पदार्थ सेवनविरोधी जनजागृतीचे नगरच्या ज्ञानसंपदा शाळेत अभियान

नगर – ज्ञानसंपदा शाळेत नशा मुक्ती अभियानांतर्गत, अमली पदार्थ सेवन विरोधी टास्क फोर्स नाशिक यांच्या वतीने इयत्ता, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करणे व अमली पदार्थ सेवनाच्या दुष्परिणामांची माहिती देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमात विश्वास बेरड, बाबासाहेब भवर, योगेश वाघ या तज्ज्ञ वक्त्यांनी विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा, सिगारेट, मद्य तसेच इतर व्यसनाधीन पदार्थांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगितले. तसेच व्यसनांपासून दूर राहण्यासाठी आवश्यक असलेली सकारात्मक जीवनमूल्ये, योग्य मित्रपरिवाराची निवड आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. शरीर मन आणि समाजावर आमली पदार्थाचे होणारे दुष्परिणाम विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले. मेंदूचा कार्यावर होणारा परिणाम निर्णय क्षमता, स्मृतिदोष, कुटुंबातील ताण तणाव, व्यसनामुळे शिक्षण, करियर, आयुष्याची दिशा कशी बदलते याविषयी मार्गदर्शन केले. काही पोस्टर उदाहरणे आणि संवादातून या अमली पदार्थाच्या सेवनाचे दुष्परिणाम सांगितले गेले. तसेच मूल्य संस्कारावर भर देत आई वडील, शिक्षक यांचा आदर राखण्यासाठी आवाहन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. यावेळी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची शपथ घेत, व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला. शाळेच्या वतीने अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होऊन निरोगी व सुदृढ पिढी घडण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर तसेच, शिक्षकवृंद व अमली पदार्थ सेवन विरोधी टास्क फोर्सच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पालकांनी आपल्या नोकरी व्यवसायाबरोबरच पाल्याकडे लक्ष देणे गरजेचे

## उपमहापौर धनंजय जाधव यांचे प्रतिपादन; बोल्हेगाव येथील किड्स सेकंड स्कूलमध्ये पालक दिन साजरा

नगर – पालक हा कुटुंबाचा महत्वाचा घटक असतो, कुटुंबाचा कर्ता करविता असतो, कुटुंबाची जबाबदारी सांभाळत असतांना त्याचे आपल्या पाल्याकडे दुर्लक्ष होते. या करिता पालकांनी सुद्धा आपला पाल्य शाळेत जात असतांना काय शिक्षण घेतो, त्याला कोणत्या गोष्टीची आवड आहे व तो समाधानी आहे का अश्या बारीक सारीक गोष्टी पालकांनी पाहणे गरजेचे आहे. जर पालकांनी आपल्या पाल्याकडे लक्ष दिले तरच त्याचे भविष्य उज्वल होण्यास मदत होऊ शकते, असे प्रतिपादन धनंजय जाधव यांनी केले.


विश्व निर्मल फाउंडेशन संचलित किड्स सेकंड होम प्री प्रायमरी सहज पब्लिक स्कुलमध्ये फादर डे हा दिवस साजरा करण्यात आला.

विश्व निर्मल फाउंडेशन संचलित किड्स सेकंड होम प्री प्रायमरी सहज पब्लिक स्कुलमध्ये फादर डे हा दिवस साजरा करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख उपमहापौर धनंजय जाधव, माजी नगरसेवक मदन आढाव, संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्ञा, कोषाध्यक्ष संदीप गांगर्डे उपस्थित होते.

श्रीनिवास बोज्ञा यांनी शाळेची माहिती दिली व शाळा ही व्यवसायिकरण न करता आपण समाजाला काही तरी देणे लागतो ही भावना लक्षात ठेवून संस्था चालविली जात असून संस्थेने स्वमालकीची जागा घेतली असून लवकरच त्या ठिकाणी बांधकाम सुरु करणार असल्याची माहिती दिली.

मदन आढाव यांनी सर्व पालकांना पालक दिना निमित्त शुभेच्छा दिल्यात. या वेळी शाळेच्या परिसरात पाहुण्याच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुरुवातीस माताजी श्री निर्मलादेवी यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून सुरुवात करण्यात आली, या कार्यक्रमामध्ये काही विद्यार्थ्यांचे पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी पालक शिवाजी वायाळ, जितेंद्र निमसे, ऋषिकेश वायकर, सचिन खेडकर, चंदू कोकाटे, पुरुषोत्तम डेंगळे, पुंड दिपक, पवार, सोनवणे, चव्हाण आदी उपस्थित होते. शाळेतील काही विदयार्थी मुले आराध्या गायकवाड, स्वरा पवार, सई पवार, वेदश्री राठोड, येवले अन्वी, शर्वरी लांडगे, अंश आढाव, ओवी चव्हाण, रितिका कदम यांनी इंग्रजी मध्ये भाषणे दिलीत व नृत्य सादर केले.

स्वागत संस्थेचे कोषध्यक्ष संदीप गांगर्डे यांनी केले. रुपाली जोशी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अर्चना चव्हाण यांनी केले. या वेळी शिक्षक संगीता गांगर्डे, अर्चना भाटे, अनिता गायकवाड, सीमा सोनावणे, सोनाली कोरडे, राणी पवार, ज्योती सुलक्षणे, किरण जाधव, ऋषिकेश क्षीरसागर, पवार नीलम, भालके मनीषा आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# विकसित भारत रोजगार योजनेतून १९ जून रोजी नियुक्तीपत्रांचे वितरण

नगर – प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना अंतर्गत नियुक्तीपत्र वितरणाचा द्वितीय टप्पा १९ जून रोजी सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विज्ञान भवन, नवी दिल्ली येथून कार्यक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन होणार असून त्याचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाद्वारे विविध आस्थापना, कंपन्या, कंत्राटदार तसेच इतर संस्थांमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर कार्यालय, पोस्ट ऑफिस शेजारी, एमआयडीसी परिसर, अहिल्यानगर येथे करण्यात येणार आहे.

संबंधित लाभार्थी तसेच नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक भविष्य निधी आयुक्त, कर्मचारी भविष्य निधी संघटना, अहिल्यानगर यांनी केले आहे.



अहिल्यानगर प्रीमियरचा चॅम्पियन स्पर्धेचे विजेतेपद फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लबने पटकावले.

# फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब ठरला अहिल्यानगर प्रीमियरचा चॅम्पियन

## सर्व सामने जिंकत पटकाविले अजिंक्यपद

नगर – अशोकभाऊ फिरोदिया स्कूल मैदानावर झालेल्या अहिल्यानगर प्रीमियर फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब संघाने सुमन फुटबॉल क्लबचा २–१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

सामन्याच्या सुरुवातीलाच फिरोदिया शिवाजियन्सने आक्रमक खेळ करत आघाडी घेतली. अभय साळवे आणि मयूर गोरखा यांनी प्रत्येकी १ गोल करत संघाला २–० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. सुमन एफसीच्या अविनाश शिंदे याने १ गोल करून फरक कमी केला, मात्र फिरोदिया शिवाजियन्सने आघाडी कायम राखत २–१ असा विजय मिळवला.

नमोह एफसी आयोजित या स्पर्धेत फिरोदिया शिवाजियन्स एफसीने स्पर्धेतील सर्व ४ सामने जिंकत अजिंक्य राहून विजेतेपद संपादन केले. संघाच्या शिस्तबद्ध आणि आक्रमक खेळामुळे त्यांना या यशावर शिक्कामोर्तब करता आले.

स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार फिरोदिया शिवाजियन्सच्या मयूर गोरखा व रोशन रिकामे यांना प्रदान करण्यात आला. बाटा एफसीच्या कामरान रंगरेज याने सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूचा पुरस्कार पटकावला, तर सुमन एफसीच्या ओंकार डोंगरे याला उत्कृष्ट गोलरक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. याशिवाय सहभागी प्रत्येक संघातील एका उत्कृष्ट खेळाडूचाही सत्कार करण्यात आला.

# फॅमिली कोर्ट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी अ‍ॅड. शिवाजी कराळे

## उपाध्यक्षपदी अ‍ॅड. अनिता दिघे आणि सचिवपदी अ‍ॅड.शिवाजी सांगळे यांची बिनविरोध निवड



फॅमिली कोर्ट अ‍ॅडव्होकेट्स बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ विधीज्ञ शिवाजीराव कराळे, उपाध्यक्षपदी अ‍ॅड.अनिता दिघे, कार्याध्यक्षपदी अ‍ॅड.लक्ष्मण कचरे, सचिवपदी अ‍ॅड.शिवाजी सांगळे, खजिनदारपदी अ‍ॅड.बाबाजी सांगळे व महिला सचिवपदी पल्लवी दातीर यांच्यासह कार्यकारणी सदस्यांची बिनविरोध निवड झाल्यावर सर्वांचा सत्कार करण्यात आला.

नगर – सुमारे २०० वर्षांची ऐतिहासिक व वैभवशाली परंपरा लाभलेल्या शहरातील जुन्या न्यायालयात असलेल्या कौटुंबिक न्यायालयातील वकिलांच्या फॅमिली कोर्ट अ‍ॅडव्होकेट्स बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ विधीज्ञ शिवाजीराव कराळे यांची तर उपाध्यक्षपदी अ‍ॅड.अनिता दिघे, कार्याध्यक्षपदी अ‍ॅड. लक्ष्मण कचरे, सचिवपदी अ‍ॅड.शिवाजी सांगळे, खजिनदारपदी अ‍ॅड.बाबाजी सांगळे व महिला सचिवपदी पल्लवी दातीर यांच्यासह कार्यकारणी सदस्यांची बिनविरोध निवड झाली. असोसिएशनचे मावळते अध्यक्ष अ‍ॅड. लक्ष्मण कचरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या असोसिएशनच्या बैठकीत सर्वानुमते नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या निवडीनंतर सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. २०२६ ते २८ या दोन वर्षांसाठी या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अ‍ॅड. कल्याण पागर यांनी कामकाज पाहिले.

या बैठकीमध्ये असोसिएशनच्या कार्यकारी सदस्यपदी अ‍ॅड. सुरेश लगड, अ‍ॅड.मच्छिंद्र आंबेकर, अ‍ॅड.कल्याण पागर, अ‍ॅड.पोपट म्हस्के, अ‍ॅड.मनीषा केळगंद्रे, अ‍ॅड. राजेश कावरे व अ‍ॅड. कु.किरण जाधव आदींच्याही सर्वानुमते नियुक्त्या करण्यात आल्या. या बैठकीत अध्यक्ष पदासाठी शिवाजी कराळे यांच्या नावाची सूचना सुरेश लगड यांनी मांडली त्यास राजेश कावरे यांनी अनुमोदन दिले.

फॅमिली कोर्ट बार असोसिएशनचे नूतन अध्यक्ष अ‍ॅड. शिवाजी अण्णा कराळे हे गेल्या ३१ वर्षांपासून वकील क्षेत्रात कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी २०१३ ते १४ या काळात अहमदनगर बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. तसेच २०२२ साली ते कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनचे संस्थापक अध्यक्षही होते. आता दुसऱ्यांदा या पदाची जबाबदारी अ‍ॅड. कराळे यांना मिळाली आहे. यावेळी अ‍ॅड. प्रभाकर शहाणे, माजी महिला सहसचिव अ‍ॅड. रोहिणी उंडे– नगरकर आदींसह वकील सदस्य उपस्थित होते.

यावेळी अ‍ॅड.शिवाजी कराळे म्हणाले, जुन्या न्यायालयाला २०० वर्ष पूर्ण झाले आहेत. अशा मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या न्यायालयातील फॅमिली कोर्ट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मिळणे हे माझे मोठे भाग्य आहे. अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा माझ्यावर टाकून सर्व सदस्यांनी मोठा विश्वास व्यक्त केला आहे. या पदाच्या माध्यमातून वकिलांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याबरोबरच बार व बेंच मध्ये सकारात्मक वातावरण ठेवण्यास प्राधान्य देऊ. तसेच सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण असे विविध क्षेत्रातील उपक्रम राबवण्यावर भर देणार आहे. सर्व वकील बंधुभगिनींना बरोबर कामकाज करणार आहे.

अ‍ॅड.अनिता दिघे म्हणाल्या, फॅमिली कोर्ट बार असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी प्रथमच महिलेला संधी देण्यात आली आहे. या असोसिएशनच्या माध्यमातून वकिलांचे मजबूत संघटन उभारण्यात आले आहे. सर्व न्यायाधीशांना व पक्षकरांना संपूर्ण सहकार्य असोसिएशनचे कायम असते.

# एक चांगला माणूस घडला तर तो दुसऱ्यालाही घडवून समाजपरिवर्तन करतो

## अनुपमा सिलास यांचे प्रतिपादन; जागतिक अनाथ मिशनच्या आशिया खंड प्रमुखांची अहिल्यानगरच्या हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशनला भेट



हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशनला जागतिक अनाथ मिशन (वर्ल्ड ऑर्फन्स मिशन) च्या आशिया खंड प्रमुख अनुपमा सिलास (अनु मॅडम) यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली.

नगर – हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशनला जागतिक अनाथ मिशन (वर्ल्ड ऑर्फन्स मिशन) च्या आशिया खंड प्रमुख अनुपमा सिलास (अनु मॅडम) यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांची पाहणी करून सुरु असलेल्या सामाजिक कार्य जाणून घेतले.

संस्थेच्या कार्याचा आढावा देतांना फाउंडेशनच्या अध्यक्षा निर्मलाताई केदारी यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. त्या म्हणाल्या, फाऊंडेशनमार्फत स्किल डेव्हलपमेंट, झोपडपट्टी भागातील जनजागृती, अन्नदान, शालेय साहित्य व गणवेश वाटप केले जाते. तसेच रेल्वे स्थानके व फ्लायओव्हर परिसरातील गरजूंना भोजन, आणि होप मिशन व होपस्टर उपक्रमांतून निराधारांना मदत व पुनर्वसनाचे कार्य सुरू आहे.

यावेळी अनुपमा सिलास म्हणाल्या, सेवा करण्यासाठी पुढे येणाऱ्या व्यक्तींमुळेच अनेकांना जीवनाचा आधार मिळतो. एखाद्या दिवशी आपल्या हातून एखाद्या गरजू व्यक्तीला मदत झाली तर तो दिवस खऱ्या अर्थाने सार्थक ठरतो. एक चांगला माणूस घडला, तर तो दुसऱ्यालाही घडवतो आणि त्यातून समाज परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते.

युद्ध किंवा इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी २०१४ पासून युक्रेनमध्ये कार्यरत असलेल्या जागतिक अनाथ मिशन चळवळीची माहिती देताना त्या म्हणाल्या, मुलांना शक्यतो त्यांच्या कुटुंबीयांशी व नातेवाईकांशी पुन्हा जोडणे, पालकांचे समुपदेशन करून त्यांना सुरक्षित आणि प्रेमळ वातावरण उपलब्ध करून देणे हे आमच्या चळवळीचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

लाईट हाऊस प्रोजेक्टची माहिती देतांना द हार्बर सोसायटी लाईट हाऊस प्रोजेक्टचे डायरेक्टर प्रमोद मगर यांनी सांगितले की, आमची सोसायटी समुदाय विकास, पुणे येथे रेड लाईट परिसरातील महिला व बालकांचे पुनर्वसन, कौटुंबिक समुपदेशन, दुर्लक्षित मुलांचे संगोपन, बेघर व निराधार व्यक्तींना मदत, महिलांसाठी शेल्टर होम, मनोरुग्ण व तणावग्रस्त व्यक्तींना आधार देणे अशा विविध क्षेत्रांत कार्यरत आहे. अहिल्यानगर येथील हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशनचे कार्य सामाजिक कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे शिवाजी जाधव यांनी अनुपमा सिलास यांचा सत्कार केला. कार्यक्रमाला पीपल्स हेल्पलाइनचे प्रकाश थोरात, डेव्हिड औचिते उपस्थित होते. नर्सिंग विभागाच्या प्रमुख मंदा मॅडम यांनी संस्थेच्या माध्यमातून सुरु असलेल्या कार्याचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले, तर अनिता वाघमारे यांनी आभार मानले. यावेळी उपस्थित विद्यार्थिनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी समाजसेवेची प्रेरणा घेण्याचा संकल्प व्यक्त केला.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये १९ जूनला कान, नाक, घसा मोफत तपासणी शिबीर



नगर – जैन सोशल फेडरेशनद्वारे संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर येथे १९ जून रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मोफत कान, नाक, घसा मोफत तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात कान, नाक, घसा आजारांवर निदान, उपचार व शस्त्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले जाईल. तज्ज्ञ डॉ. अतुल तुपे व डॉ. सुकेशिनी गाडेकर रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

हॉस्पिटलमध्ये कान, नाक, घसा आजारांवर प्रभावी उपचार सुविधा उपलब्ध आहेत. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने शस्त्रक्रियाही करण्यात येतात. या उपचार सुविधांचा जास्तीत जास्त रूग्णांना लाभ मिळावा यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात टॉन्सिल शस्त्रक्रिया, नाकाच्या हाडाची शस्त्रक्रिया, मॅस्टॉइड शस्त्रक्रिया, कानाच्या पडद्याची शस्त्रक्रिया, अश्रु वाहिनी संसर्ग शस्त्रक्रिया, सायनस शस्त्रक्रिया, कानाच्या पाळीची शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात केल्या जातील. औषध खर्च वेगळा असेल.

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रूपये (संपर्क : मो. ९४०५२७१८७८), सिटी स्कॅन १२५० रूपये (संपर्क : मो. ९४०४२९९९११), एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर.आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. (संपर्क : मो. ९४०४२९७४११). २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सँम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते. (होम ब्लड सँम्पलसाठी संपर्क : मो. ९३७३८०७८४२). मोफत कान, नाक, घसा विकार तपासणी शिबिराच्या रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१– २३२०४७३/ ७४/७५ / ७६.

# नगरमध्ये १८ जूनला मोफत 'हृदयरोग तपासणी शिबीर'

नगर – पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. याशिवाय जास्तीत जास्त रूग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी १८ जून रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नगर शहरात तारकपूर येथील साई एशियन हॉस्पिटलमध्ये दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी प्रसिध्द हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात तपासणी करून घ्यावी. नगरमधील शिबिरासाठी ०२४१– २३२५६४८ या क्रमांकावर नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# पद्मशाली युवा शक्ती ट्रस्टतर्फे ४०० विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

## ज्ञानदीप प्रज्वलित करणारा उपक्रम



नगर – पद्मशाली युवा शक्ती ट्रस्ट व पद्मशाली महिला शक्ती यांच्या वतीने गेल्या दहा वर्षांपासून गरजू विद्यार्थ्यांसाठी वही वाटपाचा उपक्रम राबविला जात आहे. यावर्षीही या उपक्रमाच्या माध्यमातून सुमारे ४०० गरजू, होतकरू व जिद्दी विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. उपक्रमाची सुरुवात गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिरात महाआरतीने करण्यात आली. त्यानंतर तोफखाना, दातरंगे मळा, शिवाजीनगर, रंगारगल्ली, चितळे रोड, श्रमिकनगर, पदमानगर, नित्य सेवा, सिव्हिल हाडको, शिमला कॉलनी, नागरदेवळे आणि भिंगार परिसरातील विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन वह्यांचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमासाठी समाजातील अनेक दानशूर व्यक्तींनी उदार हस्ते आर्थिक सहकार्य करून सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी दर्शन घडविले. यामध्ये विशाल गाजुल, प्रवीण कट्टा, ओम राजेश कुरापाटी, सुभाष व्यंकटेश वल्लाकटी, विजय शेराल, म्याना चंद्रकांत, संतोष शिरापुरी, मल्लिकार्जुन इराबत्तिन, दिगंबर नोमुल, विश्वनाथ कट्टा, तुषार बुर्ला, दत्तात्रय नल्ला (पुणे), संजय रामलाल आडेप, गोपाल मंगलारप, गणेश जिंदम, किशोर पवार, दत्तात्रय जोग, प्रभाकर लाखापती, शोभा अशोक भोर (अकोळनेर), कृष्णा अर्जुन कोडम, नरेश कोटा, श्रीनिवास बोड्डू, विठ्ठल मच्चा (पुणे), भीमकाका सिरसूल, दत्तात्रय नारायणराव न्यालपेल्ली, अमर कोडम (नाशिक), कविता प्रकाश कोमार, संतोष आडेप, संतोष बुचय्या दुलम, वंदना प्रमोद रामदिन, संजय मंगलारप, सागर आरकल, कृष्णा पेंडम, मुनेश म्याना, उमा बडगु, डॉ. साईनाथ चिंता, पराग डेरेकर तसेच नाव प्रसिद्ध न करण्याची इच्छा व्यक्त केलेल्या काही दात्यांचा समावेश आहे. त्यांच्या सहकार्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला नवे बळ प्राप्त झाले आहे.

यावेळी योगेश म्याकल, दीपक गुंडू आणि सुमित इप्पलपेल्ली यांनी मनोगत व्यक्त करताना शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचा मार्ग सुकर होतो, असे सांगितले. समाजातील प्रत्येक गरजू विद्यार्थ्यापर्यंत मदतीचा हात पोहोचवून त्याच्या ज्ञानयात्रेला बळ देणे, हीच या उपक्रमामागील प्रेरणा असल्याचे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुमित इप्पलपेल्ली, योगेश ताटी, सागर बोगा, योगेश म्याकल, श्रीनिवास इप्पलपेल्ली, नारायण मंगलारप, श्रीनिवास एल्लाराम, अजय म्याना, सागर आरकल, सतीश चिंता, विराज म्याना, आदेश गुंडू, सुरेखा विद्दे, उमा कुरापटी, सारिका सिधम, निता बल्लाळ, लक्ष्मी म्याना, रेणुका जिंदम, सुनंदा नागुल वैशाली कुरापटी आदी सदस्यांनी परिश्रम घेतले. त्यांच्या समर्पित सेवाभाव, संघटनकौशल्य आणि सामाजिक बांधिलकीमुळे हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

# चाँद शेख यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर



नगर – पुणे येथील अल्बोस टेक्नॉलॉजी यांच्या सौजन्याने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना महाराष्ट्र भूषण २०२६ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुणे येथे २० जून रोजी होणाऱ्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात येणार असल्याची माहिती कार्यक्रमाचे संयोजक रोहित गांधी यांनी दिली. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी साहित्यिक सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी, सिने अभिनेत्री माधुरी पवार, पै. नाना डोंगरे, आशू सुरपूर, संदिप रासकर आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

चाँद हुसेन शेख यांनी शिक्षक म्हणून कार्यरत असताना अनेक विद्यार्थ्यांना घडवून त्यांना उज्ज्वल भविष्याची दिशा दिली आहे. शिक्षणाबरोबरच त्यांनी सामाजिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदवला आहे. विशेष म्हणजे ते उत्कृष्ट पोवाडा गायक असून सांस्कृतिक परंपरेचे जतन करण्याचे कार्यही त्यांनी केले आहे. त्यांनी ज्या–ज्या ठिकाणी शिक्षक म्हणून सेवा बजावली, त्या ठिकाणी ग्रामस्थांच्या लोकसहभागातून शाळांच्या इमारती उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. किन्ही (पारनेर), दरेवाडी (नगर), हिवरेझरे (नगर), कनोली (संगमनेर), नाचनगाव (अकोले) आणि नवनागापूर (नगर) येथील शाळांच्या इमारतींची कामे त्यांनी यशस्वीरीत्या मार्गी लावली आहेत. या कार्याची दखल घेऊन त्यांना सदर पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# एमबीबीएस डॉक्टर पदवी फर्स्ट क्लासमध्ये मयूर साठे उत्तीर्ण



नगर – येथील मयूर साठे यांनी एमबीबीएस डॉक्टर ही पदवी फर्स्ट क्लासमध्ये उत्तीर्ण होऊन मिळवली. गव्हर्नमेंट कॉलेज नंदुरबार येथे डॉक्टर मयूर यांचे एमबीबीएस अभ्यासक्रमाचे शिक्षण पूर्ण झाले असून देशाच्या सैनिक असलेल्या वडीलांचे स्वप्न त्यांनी पुर्ण केले.

सावेडी येथील श्री समर्थ विद्या मंदीर येथे सेमी इंग्लिशमध्ये त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण पुर्ण झाले असून त्यांच्या संपुर्ण नातेवाईकांमधे मयूर हे पहिलेच एकमेव एमबीबीएस डॉक्टर आहेत. त्यांची बहिण गुणप्रिया या देखील गव्हर्नमेंट कॉलेजमधून एम.डी आयुर्वेद या पदवीचे शिक्षण सध्या नागपूर येथे घेत आहेत. मयूर हे इंडीयन नेव्हीमधील सुधीर साठे आणि लेखिका कवयित्री आशा साठे यांचे चिरंजीव आहे.

# 'अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन'च्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि करिअर मेळावा उत्साहात

## बाबावाडी येथील निराधार मुलांना खाऊ वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली



'अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन'च्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि करिअर मेळावा उत्साहात झाला.

नगर – अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (ट्रस्ट) यांच्या वतीने सक्कर चौक येथील हॉटेल यश पॅलेसमध्ये आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व करिअर मार्गदर्शन मेळावा २०२६ उत्साहात झाला. या सोहळ्याच्या निमित्ताने फाउंडेशनच्या वतीने बाबावाडी येथील निराधार मुलांना खाऊ वाटप करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविण्यात आले.

मेळाव्यात मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थी व पालकांना उच्च शिक्षण, NEET, UPSC, MPSC, वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच विविध रोजगार व करिअर संधींबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास नगरसेवक योगीराज गाढे व नगरसेवक नवनाथ कातोरे यांनी विशेष उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात मोठी उद्दिष्टे ठेवून यश संपादन करण्याचे आवाहन केले. तसेच अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.

मुख्य मार्गदर्शक म्हणून डॉ. धनंजय वारे, डॉ. दादासाहेब करंजुले, इंजि. डॉ. विजयकुमार ठुबे, प्रा. अमोल सायंबर आणि प्रा. अतुल सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना करिअर नियोजन, स्पर्धा परीक्षांची तयारी, वेळेचे व्यवस्थापन आणि व्यक्तिमत्त्व विकास याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक गाढे, मनोज सोनवणे, संदीप नवसुपे, सिद्धांत पानसरे, शशिकांत भांबरे, भरत सुंबे, सागर भोसले, जगन्नाथ निमसे, मिलिंद जपे, मयूर पवार, वैभव भोगाडे परमेश्वर पाटील, विलास तळेकर, अनुराधा येवले, बालाजी काळे, रत्नाकर दरेकर, सुधीर दुसंगे, राजाभाऊ शिर्के, गणेश सागर, अनंत देठे, अशोक कुटे, रोहिणी वाघमारे, मोहिनी सोनवणे, दारकुंडे सर, श्रीपाद दगडे, अक्षय तोडमल, संजय शिंदे, दत्ता वाबळे, मित गाढे व तेजस सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिवजल पाईपचे राम जरांगे, साई मुरली लॉन्सचे जगन्नाथ निमसे, यश पॅलेस हॉटेलचे योगीराज गाडे, जेआरपी ग्रुपचे जगदीश पिंपळे, अजित मोरे तसेच आरोग्यसदन हॉस्पिटल यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन अधिक प्रभावीपणे पार पडले.

कार्यक्रमाच्या शेवटी अखंड मराठा फाउंडेशनच्या वतीने आभार मानण्यात आले.

# अर्थजगत

सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांकडून (एफपीआय) भारतीय बाजारात होत असलेली मोठ्या प्रमाणाची विक्री, यामुळे रुपयावर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. रुपयाचे मूल्य घसरत असताना, रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) व्याजदरांमध्ये वाढ करून रुपया घसरण्यापासून वाचवावा, असा सल्ला अनेकांकडून सातत्याने दिला जात आहे. व्याजदर वाढवण्यामागे असा युक्तिवाद केला जातो की, व्याजदर वाढल्यास कर्ज घेणे महाग होईल, ज्यामुळे बाजारातील सट्टेबाजीला आळा बसेल आणि परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करणे सोपे होईल. मात्र, हा दृष्टिकोन अर्थव्यवस्थेसाठी घातक ठरू शकतो.

## व्याजदर वाढवून रुपया सावरणे धोक्याचे?



■ धोरण

अर्थशास्त्रातील प्रसिद्ध 'टिनबर्गेन सिद्धांता'नुसार, एका धोरणात्मक साधनाचा वापर केवळ एकाच उद्दिष्टासाठी केला पाहिजे. रिझर्व्ह बँक प्रामुख्याने महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी (मूल्य स्थिरता) व्याजदराचा वापर करते. जर रिझर्व्ह बँकेने विनिमय दर (रुपयाचे मूल्य) नियंत्रित करण्यासाठी व्याजदराचा वापर सुरू केला, तर बाजारात संभ्रम निर्माण होईल आणि महागाई नियंत्रणाच्या उद्दिष्टाबाबत रिझर्व्ह बँकेच्या विश्वासार्हतेला धक्का बसेल. इतिहास साक्षी आहे की, व्याजदर वाढवून रुपयाची घसरण थांबवता येत नाही. २०१३ मध्ये जेव्हा अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने आपली आर्थिक सवलतींची धोरणे मागे घेण्याची घोषणा केली (ज्याला 'टेपर टँट्रम' म्हटले जाते), तेव्हा भारताने रुपया स्थिर करण्यासाठी व्याजदरांचा आधार घेतला होता, पण तो पूर्णपणे अपयशी ठरला. त्या वेळी रुपया स्थिर झाला तो व्याजदरामुळे नाही, तर रिझर्व्ह बँकेने बँकांसाठी सुरू केलेल्या सवलतीच्या परदेशी चलन अनिवासी ठेव स्वॅप विंडोच्या माध्यमातून उभारलेल्या ३४ अब्ज डॉलरच्या निधीमुळे.

व्याजदरांच्या माध्यमातून विनिमय दर नियंत्रित करायचा असल्यास पतधोरण समितीला व्याजदरात खूप मोठी वाढ करावी लागेल. अशी मोठी वाढ केल्यास देशांतर्गत कर्ज महाग होईल, ज्यामुळे उद्योगांची वाढ खुंटेल आणि पर्यायाने वास्तविक अर्थव्यवस्थेचे प्रचंड नुकसान होईल. हाच विचार करून जगातील बहुतांश केंद्रीय बँका चलन वाचवण्यासाठी व्याजदर वाढवण्याचा प्रयोग टाळतात.

सध्याची परिस्थिती २०१८ सारखीच आहे. त्या वेळीही अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हचे धोरण आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे चालू खात्यातील तूट वाढली होती आणि परदेशी निधी बाहेर जात असल्याने रुपया दबावाखाली आला होता. तेव्हाही अनेकांनी व्याजदर वाढवण्याची मागणी केली होती. ऑक्टोबर २०१८ च्या बैठकीत जेव्हा एमपीसीने व्याजदर स्थिर ठेवले, तेव्हा सुरुवातीला रुपयात एक टक्का घसरण झाली; कारण रिझर्व्ह बँक रुपया वाचवण्यासाठी व्याजदर वापरणार नाही हे स्पष्ट झाले होते. परंतु, दीर्घकालीन विचार करता तो निर्णय अर्थव्यवस्थेसाठी योग्य ठरला होता.

रुपयावर सध्या असलेला दबाव हा देशांतर्गत कारणांमुळे नसून जागतिक घडामोडींमुळे आहे. अशा स्थितीत व्याजदर वाढवणे हा तात्पुरता आणि आत्मघातकी उपाय ठरेल. त्याऐवजी, परदेशी गुंतवणूक देशातच रोखून धरण्यासाठी 'कॅपिटल गेन्स टॅक्स' (भांडवली नफा कर) सारख्या कर नियमांमध्ये सुधारणा करणे आणि इतर रचनात्मक उपाययोजना करणे अधिक गरजेचे आहे, जेणेकरून अर्थव्यवस्थेच्या मूळ वाढीला धक्का न लावता रुपयाची स्थिती सुधारता येईल. ◆◆◆




## 'एआयएस'मध्ये विसंगती नको

**आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी प्राप्तिकर परतावा (आयटीआर) भरण्याची प्रक्रिया आता सुरू झाली आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या या युगात करदात्यांसाठी ही प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, यासाठी प्राप्तिकर विभागाकडून 'प्री-फिल्ड' म्हणजेच आधीच माहिती भरलेले फॉर्म उपलब्ध करून दिले जातात. अनेक करदाते या सुविधेचा लाभ घेऊन घाईघाईने आपला परतावा दाखल करतात. परंतु, अॅन्युअल इन्फॉर्मेशन स्टेटमेंट - एआयएस आणि करदात्याने जाहीर केलेली प्रत्यक्षातील माहिती यात किरकोळ विसंगती आढळल्यास, थेट प्राप्तिकर विभागाची नोटीस येऊ शकते.**

पगार, मुदत ठेव (एफडी) वरील व्याज किंवा भांडवली नफा (कॅपिटल गेन्स) यांसारख्या महत्त्वाच्या उत्पन्नाच्या स्रोतांमध्ये होणाऱ्या चुका करदात्यांना महागात पडू शकतात.

प्राप्तिकर विभाग आता केवळ कागदपत्रांच्या तपासणीवर अवलंबून नसून, कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स - एआय), स्वयंचलित डेटा मॅचिंग सिस्टीम आणि डिजिटल पडताळणी यांसारख्या अत्यंत प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करत आहे. यामुळे करदात्याने भरलेली माहिती आणि विभागाकडे उपलब्ध असलेला डेटा यातील सूक्ष्म तफावतही त्वरित पकडली जाते. या संपूर्ण प्रक्रियेच्या केंद्रस्थानी 'एआयएस' हे विवरणपत्र असते. यामध्ये करदात्याचे वेतन, बँक व्याजाचे उत्पन्न, समभाग किंवा म्युच्युअल फंडांमधील व्यवहार, मालमत्तेची खरेदी-विक्री, उगमस्थानी कापलेला कर (टीडीएस) आणि परदेशी पाठवलेले पैसे अशा सर्व उच्च मूल्याच्या व्यवहारांची सविस्तर नोंद असते. ही माहिती बँका, वित्तीय संस्था, ब्रोकर आणि नियोक्त्यांकडून (एम्प्लॉयर) गोळा केली जाते.

'एआयएस' हे कर अनुपालनासाठी एक अत्यंत महत्त्वाचे साधन असले, तरी करदात्यांनी केवळ आणि केवळ यावरच अवलंबून राहून आपला आयटीआर भरू नये. अनेकदा वित्तीय संस्थांकडून माहिती सादर करण्यास होणारा उशीर, माहितीची दुरुस्ती किंवा डेटाची पुनरावृत्ती (डुप्लिकेशन) यामुळे 'एआयएस' मध्ये काही त्रुटी असू शकतात. त्यामुळे करदात्यांनी आपला आयटीआर दाखल करण्यापूर्वी 'एआयएस' मधील माहितीची पडताळणी फॉर्म २६एएस, फॉर्म १६, बँक स्टेटमेंट आणि गुंतवणुकीच्या मूळ कागदपत्रांशी करून घेणे अनिवार्य आहे. दोन्ही माहितीमध्ये तफावत असेल आणि करदात्याने सुधारणा न करता परतावा भरला, तर प्राप्तिकर विभागाच्या स्वयंचलित प्रणालीद्वारे परतावा छाननीसाठी (स्क्रुटिनी) निवडला जातो.

प्राप्तिकर नोटीस येण्यामागे पगारातील विसंगती हे सर्वात मोठे आणि सामान्य कारण मानले जाते. करदात्याने आयटीआरमध्ये दाखवलेला पगार आणि फॉर्म १६ किंवा नियोक्त्याने भरलेल्या टीडीएस विवरणातील आकडे यात फरक असल्यास नोटीस येऊ शकते.


वर्षाच्या मध्यात झालेली वेतनवाढ, बोनस किंवा आर्थिक वर्षात बदललेली नोकरी यामुळे ही तफावत उद्भवते. उत्पन्नाचे अचूक वर्गीकरण न केल्यास कर विभागाकडून स्पष्टीकरण मागवले जाते.

■ अर्थसल्ला

अनेकदा करदात्यांची एकापेक्षा जास्त बँकांमध्ये खाती असतात. या सर्व खात्यांमधून मिळालेले एकूण व्याज एकत्र करून ते आयटीआरमध्ये दाखवणे आवश्यक असते. व्याजाचे उत्पन्न अंशतः किंवा पूर्णपणे लपवल्यास डेटा मॅचिंग प्रणालीद्वारे विसंगती समोर येते.

भांडवली नफ्याचे (कॅपिटल गेन्स) रिपोर्टिंग हे प्राप्तिकर विभागाच्या विशेष रडारवर आले आहे. शेअर्स, म्युच्युअल फंड किंवा स्थावर मालमत्तेची विक्री यांसारखे व्यवहार ब्रोकर आणि निबंधक कार्यालयांद्वारे स्वतंत्रपणे रिपोर्ट केले जातात आणि ते 'एआयएस' मध्ये आधीच नोंदवलेले असतात. मालमत्तेच्या विक्री व्यवहाराची माहिती लपवणे, इंडेक्सेशन किंवा महागाई समायोजनाची चुकीची गणना करणे किंवा करपात्र नफ्याचे चुकीचे हिशोब मांडणे यामुळे करदाते अडचणीत येऊ शकतात. जरी व्यवहाराची मूल्ये 'एआयएस' मध्ये दिसत असली, तरी त्यावरील नफ्याची अचूक गणना करून ती परताव्यात योग्य प्रकारे मांडण्याची अंतिम जबाबदारी करदात्याचीच असते, हे लक्षात ठेवले पाहिजे. ◆◆◆

## गुंतवणुकीस उशिर झाल्यास...



विशीच्या वर्षात गुंतवणूक सुरू करणे सर्वात आदर्श मानले जात असले, तरी ३० किंवा ४० व्या वर्षी सुरू केलेली गुंतवणूक देखील शिस्तबद्ध नियोजनाच्या जोरावर एक मोठा आणि भक्कम निधी (कॉर्पस) उभा करून देऊ शकते. या वयात गुंतवणूक सुरू करताना काही विशेष गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

गुंतवणुकीमध्ये वयाचा खूप मोठा फरक पडतो, कारण काळ हा चक्रवाढ व्याजाचा (कम्पाउंडिंग) मुख्य कणा आहे. जितका जास्त काळ पैसा गुंतवलेला राहील, तितका परताव्यावर मिळणारा परतावा वेगाने वाढतो. उदाहरणार्थ, जर एखाद्या व्यक्तीने १२ टक्के वार्षिक परताव्याच्या अपेक्षेने १ लाख रुपयांची एकरकमी गुंतवणूक केली, तर वयाच्या ६० व्या वर्षी मिळणारा निधी पुढीलप्रमाणे बदलतो.

२५ व्या वर्षी गुंतवणूक केल्यास ६० व्या वर्षी त्याचे ५३ लाख रुपये होतात. ३० व्या वर्षी गुंतवणूक केल्यास त्याचे ३० लाख रुपये होतात. ३५ व्या वर्षी हीच रक्कम १७ लाख रुपये होते, तर ४० व्या वर्षी गुंतवणूक केल्यास वयाच्या ६० व्या वर्षी केवळ १० लाख रुपये हाती येतात. यावरून वेळेचे महत्त्व स्पष्ट होते, परंतु तरीही ३० किंवा ४० व्या वर्षी खचून न जाता बचतीचा दर वाढवून उद्दिष्टे साध्य करता येतात.

या वयात गुंतवणूक प्रवासाची पायाभरणी करताना सर्वात आधी आर्थिक सुरक्षा कवच निर्माण करणे गरजेचे आहे. या टप्प्यावर कुटुंबाची जबाबदारी असल्याने पुरेशा रकमेचा जीवन विमा आणि आरोग्य विमा घेणे अत्यंत बंधनकारक आहे, जेणेकरून कोणत्याही वैद्यकीय आणीबाणीत जमा पुंजी खर्च होणार नाही. यासोबतच अचानक येणाऱ्या संकटांसाठी, जसे की नोकरी जाणे किंवा इतर तातडीचे खर्च, यासाठी किमान ६ महिन्यांच्या खर्चासाठी उपयुक्त ठरेल एवढा आपत्कालीन निधी (इमर्जन्सी फंड) बँक खात्यात किंवा लिक्विड फंडांमध्ये सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. उशिरा सुरुवात करणाऱ्यांसाठी नेहमीच्या ५० :३०:२० या बजेट नियमात बदल करणे गरजेचे ठरते. नेहमीच्या नियमानुसार ५० टक्के गरजांवर, ३० टक्के इच्छांवर आणि २० टक्के बचतीवर खर्च केले जातात. परंतु, ३० किंवा ४० व्या वर्षी गुंतवणूक करताना ५० टक्के गरजांवर, इच्छा व चैनीचे खर्च कमी करून ते २० टक्क्यांवर आणणे आणि बचतीचा हिस्सा वाढवून तो ३० टक्के करणे फायदेशीर ठरते. यासाठी अनावश्यक चैनीचे खर्च टाळणे, क्रेडिट कार्डचे ३० टक्के ते ५० टक्के व्याज दराचे कर्ज टाळणे आणि बँक खात्यात पडून असलेली अतिरिक्त रक्कम योग्य म्युच्युअल फंडात एकरकमी गुंतवणे फायदेशीर ठरते.

■ गुंतवणूक

गुंतवणूक करताना प्रत्येक ध्येय निश्चित आणि मोजता येणारे असणे गरजेचे आहे. समजा मुलाच्या उच्च शिक्षणासाठी १० वर्षांनंतर २० लाख रुपयांची गरज आहे, तर ६ टक्के महागाईचा दर विचारात घेता १० वर्षांनंतर त्या शिक्षणाचा खर्च जवळपास ३६ लाख रुपये होईल. हे ३६ लाख रुपयांचे ध्येय गाठण्यासाठी १० वर्षांच्या कालावधीत वेगवेगळ्या परताव्याच्या दरानुसार आवश्यक असणारी मासिक एसआयपी (सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) पुढीलप्रमाणे असेल.

१२ टक्के परतावा मिळाल्यास दरमहा १५,४९५ रुपयांची एसआयपी करावी लागेल. १० टक्के परतावा मिळाल्यास ही रक्कम १७,४२९ रुपये असेल, तर ८ टक्के परताव्यासाठी १९,५४८ रुपये आणि ६ टक्के परतावा अपेक्षित असल्यास दरमहा २१,८५८ रुपयांची गुंतवणूक करावी लागेल. ही ध्येये पूर्ण करण्यासाठी पगारदार व्यक्तींनी मासिक एसआयपीचा वापर करावा आणि जेव्हा बोनस किंवा अतिरिक्त उत्पन्न मिळेल, तेव्हा एकरकमी (लम्पसम) गुंतवणूक करून आपले आर्थिक भविष्य सुरक्षित करावे. ◆◆◆

## सध्याच्या काळात स्मॉलकॅपमध्ये गुंतवणूक करावी का?



बजाज फिनसर्व्ह अॅसेट मॅनेजमेंट कंपनीच्या ताज्या अहवालानुसार, सध्याच्या काळात स्मॉलकॅप फंडांमध्ये गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण तयार होत आहे. सुधारणारे फंडामेंटल्स, सामान्य पातळीवर येणारे व्हॅल्यूएशन आणि कंपन्यांच्या कमाईमध्ये संभाव्य सुधारणा ही यामागील प्रमुख कारणे आहेत. जेव्हा बाजार रिकव्हरीच्या टप्प्यात असतो, तेव्हा हा सेगमेंट अनेकदा चांगली कामगिरी करतो, ज्यामुळे गुंतवणूकदारांसाठी उत्तम संधी निर्माण होऊ शकते. २०२० ते २०२४ या काळात स्मॉलकॅप फंडांनी मोठी तेजी दाखवली होती, मात्र ऑक्टोबर २०२४ पासून त्यांची कामगिरी घसरू लागली आणि हा ट्रेंड २०२६ च्या पहिल्या सहामाहीपर्यंत कायम राहिला. असे असले तरी, गेल्या तीन महिन्यांत या श्रेणीने ६.३ टक्के वाढ नोंदवली आहे.

२०२४ मधील सर्वोच्च पातळीवरून स्मॉलकॅप शेअर्सच्या व्हॅल्यूएशनमध्ये लक्षणीय घसरण झाली असून, आता ते वाजवी पातळीवर आले आहेत. 'एडलवाईज'च्या मते स्मॉलकॅप व्हॅल्यूएशन सध्या वन-इयर फॉरवर्ड प्राईस-टू-अर्निंग्ज (पी/ई) रेशोच्या जवळपास २१ पट आहे, जे दीर्घकालीन ऐतिहासिक सरासरीच्या अगदी जवळ आहे. अलीकडील घसरणीनंतर स्मॉलकॅप आता फेअर व्हॅल्यूवर आले आहेत, परंतु तरीही सुरक्षिततेचा गाभा मर्यादित असल्याने गुंतवणूक करताना शिस्त पाळणे आवश्यक आहे. द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंडाच्या अपर्णा शंकर यांच्या मते, व्हॅल्यूएशनमधील फरक अजूनही कायम असल्याने सक्रिय व्यवस्थापन आणि योग्य स्टॉक निवड अत्यंत महत्त्वाची ठरते. स्मॉलकॅप कंपन्यांच्या कमाईतील वाढ हा या बाजारासाठी सर्वात महत्त्वाचा घटक मानला जात आहे. तज्ज्ञांच्या मते, देशांतर्गत मागणी मजबूत असल्यामुळे आणि विविध क्षेत्रांमध्ये ऑपरेटिंग लिव्हरेजचा प्रभाव दिसत असल्याने कंपन्यांच्या उत्पन्नात सुधारणा होण्याची आशा आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, कमाईतील मंदी किंवा घसरणीच्या काळानंतर अनेकदा मोठी तेजी पाहायला मिळते, आणि सध्या तसेच संकेत मिळत आहेत. याशिवाय, देशांतर्गत मागणीतील सुधारणा आणि उद्योगांमधील क्षमता वापर वाढल्यामुळे स्मॉलकॅप कंपन्यांच्या वाढीला बळ मिळू शकते. सध्या स्मॉलकॅप सेगमेंटचे फंडामेंटल्स मजबूत आहेत. अनेक स्मॉलकॅप कंपन्यांची ताळेबंद पत्रके भक्कम असून, मागील चक्रांच्या तुलनेत त्या अधिक चांगल्या स्थितीत आहेत.

■ सल्ला मोलाचा

अलीकडच्या वर्षांत या कंपन्यांनी विस्तारासाठी कर्जावर अवलंबून राहण्याऐवजी स्वतःच्या अंतर्गत रोख प्रवाहाचा वापर केला आहे, ज्यामुळे त्यांच्यावर कर्जाचा बोजा कमी असून नफा वाढण्यास मदत झाली आहे. अनेक लहान कंपन्या भांडवली खर्च आधारित उपक्रमांमधून नफा मिळवण्यासाठी चांगल्या स्थितीत आहेत. तथापि, गुंतवणूकदारांनी यामध्ये प्रवेश करण्यापूर्वी या क्षेत्राशी निगडित जोखीम पूर्णपणे समजून घेणे गरजेचे आहे. ◆◆◆

## सॅलरी अकौंट फायद्याचे; पण...




नोकरी करणाऱ्या लोकांसाठी सॅलरी अकाउंट (वेतन खाते) हा बँकिंगचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग बनला आहे. कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांचे वेतन थेट जमा करण्यासाठी बँकांसोबत करार करून हे खाते उघडतात. वरवर पाहता यामध्ये अनेक आकर्षक सुविधा दिसत असल्या, तरीही त्यामागे काही छुपे नियम आणि अटी असतात ज्याकडे ग्राहकांचे सहसा लक्ष जात नाही.

**सॅलरी अकाउंटचे प्रमुख फायदे**

या खात्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे यामध्ये किमान शिल्लक (मिनिमम बॅलन्स) ठेवण्याचे बंधन नसते, ज्यामुळे कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळतो. याशिवाय बँका मोफत डेबिट कार्ड, मर्यादित स्वरूपात मोफत एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा आणि सुलभ ऑनलाईन व्यवहार उपलब्ध करून देतात.

काही बँका सॅलरी अकाउंट असलेल्या ग्राहकांना ओव्हरड्राफ्ट (खात्यात पैसे नसतानाही ठराविक रक्कम काढणे) सुविधाही देतात, जी आणीबाणीच्या काळात उपयुक्त ठरते. तसेच वैयक्तिक कर्ज (पर्सनल लोन) आणि क्रेडिट कार्ड सारख्या वित्तीय उत्पादनांसाठी बँका या ग्राहकांना प्राधान्य देतात.

सॅलरी अकाउंटमधील सुविधा या ग्राहकाच्या नोकरीवर आणि खात्यात नियमितपणे जमा होणाऱ्या वेतनावर अवलंबून असतात. जेव्हा खात्यामध्ये वेतन जमा होणे बंद होते, तेव्हा बँक या खात्याचे रूपांतर सामान्य बचत खात्यात (सेव्हिंग अकाउंट) करू शकते. अशा बदल्यानंतर किमान शिलकीची अट लागू होते आणि अनेक मोफत सुविधा एकतर बंद होतात किंवा मर्यादित केल्या जातात.

तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, ओव्हरड्राफ्ट सुविधा आणीबाणीच्या काळात मदत करत असली, तरी तिचा अयोग्य वापर आर्थिक भार वाढवू शकतो, कारण यावर लागणारे व्याज सामान्य कर्जापेक्षा जास्त असू शकते. याव्यतिरिक्त, अनेक मोफत मिळणाऱ्या सुविधा अटींसह येतात. उदाहरणार्थ, काही बँका केवळ एका निश्चित मासिक वेतन मर्यादेवरच मोफत लाभ देतात. जर ती अट पूर्ण झाली नाही, तर विविध शुल्क लागू होऊ शकतात. ग्राहकांना या अटींची पूर्ण माहिती नसल्यामुळे नंतर त्यांच्या खात्यातून अनपेक्षितपणे पैसे कापले जातात.

त्यामुळे सॅलरी अकाउंट वापरताना त्याशी संबंधित बँकेचे नियम, अटी आणि वेतन बंद झाल्यास होणारे बदल याबद्दल पूर्ण माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. ◆◆◆

## हक्काची रक्कम विसरलात?

बँक खाती, विमा पॉलिसी, शेअर्स किंवा म्युच्युअल फंड यामध्ये गुंतवणूक करून ती विसरून जाणाऱ्या नागरिकांसाठी केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अनेकदा गुंतवणूकदाराच्या मृत्यूनंतर किंवा पत्ता बदलल्यामुळे कुटुंबातील सदस्यांना अशा जुन्या गुंतवणुकीची कोणतीही माहिती नसते. हीच अडचण दूर करण्यासाठी सरकारने एक नवीन आणि एकत्रित 'कॉमन पोर्टल' सुरू केले आहे, ज्याच्या माध्यमातून नागरिक आपली अनेक वर्षांपासून पडून असलेली हक्काची रक्कम सहज शोधू शकणार आहेत.

'युअर मनी, युअर राईट' म्हणजेच 'तुमचा पैसा, तुमचा अधिकार' या मोहिमेचा एक भाग म्हणून हे पोर्टल आणले गेले असून, 'पीएसबी अलायन्स'च्या सहकार्याने ते विकसित करण्यात आले आहे. या एकाच व्यासपीठावर नागरिकांना बँकांमधील पडून असलेल्या ठेवी, विम्याचे प्रलंबित दावे, हक्क न सांगितलेले शेअर्स, लाभांश (डिव्हिडंड) आणि म्युच्युअल फंडमधील निष्क्रिय रक्कम या सर्वांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होईल. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना वेगवेगळ्या वित्तीय संस्थांच्या किंवा बँकांच्या स्वतंत्र चकरा मारण्याची अजिबात गरज उरणार नाही.



या पोर्टलचा वापर करण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी ठेवण्यात आली असून, तिथे केवळ स्वतःचे नाव, पॅन कार्ड क्रमांक किंवा इतर आवश्यक वैयक्तिक तपशील नोंदवून शोध घेता येतो. यंत्रणा स्वतःहून विविध वित्तीय संस्थांच्या माहितीकोषातून (डेटाबेसमधून) संबंधित माहिती शोधून समोर आणते. विशेषतः ज्या कुटुंबांना आपल्या दिवंगत नातेवाईकांच्या जुन्या गुंतवणुकीची पुसटशीही कल्पना नाही, अशा वारसांसाठी ही व्यवस्था अत्यंत मोलाची आणि पारदर्शक ठरेल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे. ◆◆◆

## लीव एनकॅशमेंट आणि करसवलतीचे नियम




नोकरी करणाऱ्या व्यक्ती आपल्या व्यस्त दिनचर्येमुळे अनेकदा वर्षातील सर्व सुट्ट्या वापरू शकत नाहीत. या शिल्लक राहिलेल्या सुट्ट्या जमा होत राहतात आणि निवृत्तीच्या (रिटायरमेंट) वेळी किंवा नोकरी बदलताना या सुट्ट्यांच्या बदल्यात कर्मचाऱ्याला रोख रक्कम मिळते. या प्रक्रियेला 'लीव एनकॅशमेंट' (सुट्ट्यांचे रोखीकरण) असे म्हणतात. असेसमेंट इयर २०२६-२७ साठी आयकर विभागाने या रकमेवरील कर सवलतीबाबत अत्यंत स्पष्ट आणि कडक नियम निश्चित केले आहेत.

आयकर कायद्यानुसार सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी सुट्ट्यांच्या पैशांवर कर आकारण्याचे नियम पूर्णपणे वेगळे आहेत. केंद्र किंवा राज्य सरकारच्या अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीच्या वेळी मिळणारी लीव एनकॅशमेंटची संपूर्ण रक्कम पूर्णपणे करमुक्त असते. त्यांना या पैशांवर कोणताही कर भरावा लागत नाही.

परंतु, खाजगी क्षेत्रातील कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये (पीएसयू) काम करणाऱ्या लोकांसाठी हा नियम वेगळा आहे. खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या संपूर्ण रकमेवर कर सवलत मिळत नाही, तर कायद्याने ठरवून दिलेल्या मर्यादेतच ही सवलत दिली जाते. खाजगी कर्मचाऱ्यांसाठी ही सवलत आयकर कायद्याच्या कलम १०(१०एए) अंतर्गत निश्चित केलेल्या नियमांच्या अधीन असते.

खाजगी क्षेत्रासाठी कर सवलतीचे गणित

खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या कर सवलतीची गणना करण्यासाठी एक विशेष फॉर्म्युला वापरला जातो. याअंतर्गत ४ वेगवेगळ्या घटकांचे मूल्यमापन केले जाते आणि या चारपैकी जी रक्कम सर्वात कमी असेल, तेवढ्याच रकमेवर कर सवलत मिळते.

पहिली स्थिती म्हणजे कर्मचाऱ्याला प्रत्यक्ष मिळालेली एकूण लीव एनकॅशमेंटची रक्कम. दुसरी स्थिती म्हणजे सरकारने ठरवून दिलेली कमाल २५००००० रुपयांची कायदेशीर मर्यादा. तिसरी स्थिती म्हणजे कर्मचाऱ्याने नोकरी सोडण्यापूर्वीच्या किंवा निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या १० महिन्यांचे सरासरी वेतन. चौथी स्थिती म्हणजे शिल्लक राहिलेल्या सुट्ट्यांचे मोजणी करून येणारी रक्कम, ज्यासाठी वर्षाला कमाल ३० दिवसांची सुट्टी गृहीत धरली जाते.

या चार गणनांमधून जी सर्वात कमी रक्कम समोर येते, तेवढीच रक्कम करमुक्त ठरते. त्यापेक्षा अधिक असलेल्या उर्वरित संपूर्ण रकमेवर कर्मचाऱ्याला त्याच्या कर टप्प्यानुसार (टॅक्स स्लॅब) कर भरावा लागतो. अनेक कर्मचारी आपल्या कंपनीच्या नियमांनुसार मिळणाऱ्या अधिक सुट्ट्या गृहीत धरून चूक करतात, परंतु प्राप्तिकर विभाग वर्षाला केवळ ३० सुट्ट्यांच्या हिशोबानेच सवलत देतो. ◆◆◆





भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नवागतांचे स्वागत करून मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

# भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात 'नवागतांचे स्वागत'; मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण

नगर – नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण, गुलाबपुष्प व पेन देऊन स्वागत तसेच मोफत पाठ्यपुस्तक वितरणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. ढोल–ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आल्याने विद्यालय परिसर आनंद आणि उत्साहाने फुलून गेला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर मुठेकर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य ज्ञानदेव बेरड होते. यावेळी मुख्याध्यापक बन्सी नरवडे, पालक प्रतिनिधी, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक बन्सी नरवडे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त व परिश्रम यांची जोड देण्याचा सल्ला दिला. शिक्षण हेच यशाचे खरे साधन असून विद्यार्थ्यांनी प्रत्येक संधीचा लाभ घेत स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा, असे त्यांनी सांगितले.

प्रमुख पाहुणे शंकर मुठेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना 'गुड टच' आणि 'बॅड टच' या विषयावर उदाहरणांसह मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन करताना त्यांनी १८ वर्षांखालील मुलांनी मोटारसायकल चालवू नये, अन्यथा पालकांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते, याची माहिती दिली. तसेच शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांनी शाळेच्या शैक्षणिक नियोजनाची माहिती देताना पहिल्याच दिवसापासून नियमित अध्यापन सुरू करण्यात आल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना वेळापत्रकांचे वितरण करण्यात आले असून मोफत पाठ्यपुस्तके, शालेय पोषण आहार, शिष्यवृत्ती योजना आणि विविध शैक्षणिक सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांनी सहशालेय व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आनंददायी शिक्षणाचा अनुभव घ्यावा, असेही ते म्हणाले.

यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना गुलाबपुष्प, पेन व गोड भोजन देण्यात आले. तसेच इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान करताना उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय पांडुळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संतोष काकडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ज्येष्ठ शिक्षक बाबासाहेब कोतकर, सोपान तोडमल, धनंजय बारगळ, शिवाजी धस, आदिनाथ ठुबे, सौ. रूपाली शिंदे, सौ. संगीता मेढे तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील गोविंद कदम, गोरक्ष कांडेकर, प्रा. एकनाथ होले, गणेश गायकवाड, बाळासाहेब कावरे, सुधाकर गायकवाड, सौ. वैष्णवी जगताप आदी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर श्रद्धा ठेवून चांगले शिक्षण आत्मसात करावे

**महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन; नय्यर विद्यालयात नवागतांचे उत्साहात स्वागत**

नगर – बजरंगबली हनुमंत राया यांनी जशी गुरूप्रति श्रीरामावर अपार श्रद्धा होती, तशी श्रद्धा विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांवर ठेवून शिक्षकांकडून चांगले ज्ञान आत्मसात करावे, असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

यावेळी नगरसेविका संध्याताई पवार, माजी नगरसेवक व संस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब पवार, सचिव बापूराव आंधळे, संचालक भास्करराव गोरे, दामोदर सातपुते, अशोक बारस्कर, जनाबाई पवार, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एकनाथ मोटे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळेत नवीन दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभप्रसंगी महापौर सौ. गाडे यावेळी बोलताना म्हणाल्या की, शाळेतील शिक्षक हे विद्यार्थ्यांना चांगले ज्ञान देण्याचे काम करत असतात. हे ज्ञान विद्यार्थ्यांनी आत्मसात करून चांगले यश संपादन करून आपली कुटुंबाची व देशाची प्रगती करावी, तसेच विद्यार्थ्यांनी आपले घर, शाळा परिसर व आपले शहर स्वच्छ ठेवून ते सुंदर ठेवण्याचे काम करावे, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी बाळासाहेब पवार म्हणाले, आमच्या शाळेत गोरगरीब व कामगारांची मुले शिक्षण घेत आहेत ते शिकावे व मोठे व्हावे. यासाठी बायजाबाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या ज्येष्ठ संचालकांनी त्यावेळी या परिसरामध्ये शाळा सुरू केली त्यानंतर पालकांनी शाळेवर विश्वास ठेवून आपल्या पाल्यांचा या शाळेत प्रवेश घेतला. संस्थेचे संचालक व सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे चांगले काम केले. म्हणून आमच्या शाळेचे असंख्य विद्यार्थी आज चांगल्या पदावर काम करत आहेत, तर काही विद्यार्थी आपल्या स्वतःचे चांगले व्यवसाय करत आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी नव्याने शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे ढोल ताशांच्या गजरात व पुष्प वर्षाव करून स्वागत करण्यात आले, तसेच सर्व शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक उपस्थितांच्या हस्ते देण्यात आले. प्रास्ताविक माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार यांनी केले. सूत्रसंचालन लक्ष्मण माने यांनी केले. संतोष नागरगोजे यांनी आभार मानले.



नय्यर विद्यालयात नवागतांचे ढोल ताशांच्या गजरात उत्साहात स्वागत करण्यात आले.

# आई–वडिलांचे, देशाचे आणि संस्कृतीचे नाव उज्ज्वल करा : गणेश कवडे

**श्री समर्थ विद्या मंदिर (प्राथमिक) सांगळेगल्ली विभागात नवागतांचे उत्साहात स्वागत; औक्षण, सनई–चौघडा, पुष्पवृष्टी व पाठ्यपुस्तक वितरणाने शैक्षणिक वर्षाचा मंगलारंभ**

नगर – शालेय जीवन हे प्रत्येकाच्या आयुष्यातील सुवर्णपान असते. या काळात मिळणारे शिक्षण, संस्कार आणि शिस्तच विद्यार्थ्यांच्या भविष्यास दिशा देतात. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे नगरसेवक गणेश कवडे यांनी सांगितले. पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना आई–वडिलांचे, गुरुजनांचे, समाजाचे, देशाचे आणि आपल्या संस्कृतीचे नाव उज्ज्वल करण्यासाठी प्रामाणिकपणे शिक्षण घ्या. मोबाईल आणि इतर आकर्षणांपासून दूर राहून ज्ञानार्जनाला प्राधान्य द्या. आजचा अभ्यास आणि मेहनत उद्याचे यश निश्चित करतात, असा प्रेरणादायी संदेश दिला.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी श्री समर्थ विद्या मंदिर (प्राथमिक) सांगळेगल्ली विभागात नवागतांचे स्वागत व पाठ्यपुस्तक वितरण सोहळा पार पडला. नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण, सनई–चौघडा वादन, पुष्पवृष्टी तसेच गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण शाळा परिसर आनंद, उत्सुकता व चैतन्याने भरून गेला होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून गणेश कवडे, नगरसेविका सौ. आशाताई डागवाले, नगरसेविका सौ. सुनिताताई गेनाप्पा उपस्थित होत्या. तसेच संस्थेचे सेक्रेटरी सुरेश क्षीरसागर, व्हाईस चेअरमन तथा शालेय समितीचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सौ. आशाताई डागवाले व सौ. सुनिताताई गेनाप्पा यांनी विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक



श्री समर्थ विद्या मंदिर (प्राथमिक) सांगळेगल्ली विभागात नवागतांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

वर्षासाठी शुभेच्छा देत अभ्यासासोबतच चांगल्या संस्कारांचे महत्त्व पटवून दिले.

संस्थेचे सेक्रेटरी सुरेश क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करून शाळेचे व पालकांचे नाव उंचवावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा शालेय समितीचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांनी आई–वडिलांच्या आज्ञेचे पालन करून शिस्त, प्रामाणिकपणा व मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे, असा मौलिक संदेश दिला.

यावेळी नवागत विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले तसेच सर्व विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. नव्या पुस्तकांचा सुगंध आणि नव्या वर्षाची उत्सुकता विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होती.

प्रास्ताविकात शाळेचे मुख्याध्यापक यांनी कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट करत शाळेत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व स्पर्धा परीक्षा उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी वर्षभर अभ्यासाकडे लक्ष देऊन चांगल्या सवयी व संस्कार अंगीकारावेत तसेच विविध स्पर्धा परीक्षा व उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सोनाली माकरे यांनी केले. परिचय सौ. तिलोत्तमा क्षीरसागर यांनी करून दिला. यादीवाचन सौ. वैशाली नगर यांनी केले. शंकर निंबाळकर यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सौ. सविता येवले, सतीश मेढे, सौ. सुनिता पांडव, भगवान जाधव, संदीप गायकवाड, किशोर महाजन आणि सौ. मोहिनी नायळे यांनी विशेष परिश्रम घेतले. या स्वागत समारंभामुळे विद्यार्थ्यांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाविषयी उत्साह निर्माण झाला असून शाळेच्या या उपक्रमाचे पालकांनीही कौतुक केले.

# श्रमिकनगरच्या श्री मार्कंडेय शाळेत औक्षणाने विद्यार्थ्यांचे स्वागत

**मनोरंजक खेळांचा विद्यार्थ्यांनी लुटला आनंद; औक्षण, फुगे आणि चॉकलेट्सने विद्यार्थी भारावले**

नगर – नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक, माध्यमिक व बालक मंदिर विद्यालयात विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण आणि पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांसाठी आकर्षक सजावट, औक्षण, चॉकलेट वाटप, मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण तसेच विविध मनोरंजक खेळांची व्यवस्था करण्यात आल्याने शाळा परिसर आनंद, उत्साह आणि नव्या उमेदीनं फुलून गेला.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेच्या प्रवेशद्वारावर फुग्यांनी सजलेली आकर्षक स्वागत कमान उभारण्यात आली होती. संपूर्ण परिसर रंगीबेरंगी रांगोळ्यांनी सजविण्यात आला होता. प्रत्येक वर्गात फुग्यांची आकर्षक सजावट करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणाचा अनुभव मिळाला. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शालेय विद्यार्थी, शिक्षक आणि पाहुण्यांच्या हस्ते पारंपरिक औक्षण करून स्वागत करण्यात आले.





यावेळी विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी विविध खेळांची व्यवस्था करण्यात आली होती. जम्पिंग पॅड आणि एअर स्लाइड यांसारख्या खेळांवर विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. शाळेच्या पहिल्याच दिवशी मिळालेल्या या अनोख्या स्वागतामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आपुलकी आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. समग्र शिक्षा अभियानांतर्गत सर्व विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तकांचे मोफत वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना चॉकलेट्स देऊन त्यांच्या आनंदात भर घालण्यात आली. शाळेने उभारलेल्या आकर्षक सेल्फी पॉइंटवर विद्यार्थ्यांनी आपल्या मित्र–मैत्रिणी आणि पालकांसमवेत छायाचित्रे काढत या संस्मरणीय दिवसाच्या आठवणी जपल्या.

या स्वागत सोहळ्यासाठी महापालिका शिक्षण मंडळाचे सावेडी केंद्र समन्वयक अरुण पालवे यांच्यासह विविध मान्यवर व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विद्या दगडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शशीकांत गोरे यांनी प्रास्ताविकातून शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांची माहिती दिली.

अरुण पालवे म्हणाले की, विद्यार्थ्यांना मोबाईल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाबाबत जागरूक राहण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, आजच्या काळात सोशल मीडियावर स्वतःची प्रतिमा चांगली दाखविण्याचा प्रयत्न केला जातो; मात्र प्रत्यक्ष आयुष्यातील नाती आणि संवाद कमी होत चालले आहेत. अभासी जगात समाज अधिकाधिक गुंतत असून त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या जीवनावरही होत आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर केवळ ज्ञान संपादन आणि अभ्यासासाठी करावा. खरे यश सोशल मीडियावर मिळत नाही, तर सातत्यपूर्ण मेहनत, उत्तम शिक्षण आणि शिस्तबद्ध जीवनशैलीतून मिळते.

ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मैदानी खेळ अत्यंत आवश्यक आहेत. शारीरिक आणि मानसिक आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी खेळांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर सातत्य, मेहनत आणि योग्य दिशा आवश्यक असते. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे मार्गदर्शक असतात आणि यशाला कोणताही शॉर्टकट नसतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विशेष म्हणजे, शाळा सुरू होण्यापूर्वी शिक्षकांनी श्रमिकनगर परिसरात व्यापक गृहभेट अभियान राबविले होते. पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांना शाळेत नियमित उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते. या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम म्हणून शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती नोंदविण्यात आली. नव्याने प्रवेश घेतलेले विद्यार्थीही आनंदाने शाळेत दाखल झाले.

कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि उपस्थितांनी विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. हा स्वागत सोहळा यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## धमकावत हॉटेलमध्ये नेऊन तरुणीवर अत्याचार

नगर – बदनामी करण्याची आणि जीवे मारण्याची धमकी देत २० वर्षीय तरुणीला छत्रपती संभाजीनगर हायवे रोडवरील एका हॉटेलमध्ये नेवून जबरदस्तीने अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी वसीम गफुर शेख (रा. पाईपलाईन हाडको, आंबेडकर चौक, सावेडी, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि आरोपी एकाच कॉलनीत राहणारे आहेत. आरोपी वसीम याने १४ जून रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास तरुणीला संभाजीनगर हायवेवरील हॉटेल चंद्रकांत येथील एका खोलीत नेले. तेथे तिची बदनामी करण्याची आणि तिला जिवे मारण्याची धमकी देऊन, तिच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने शारीरिक अत्याचार केला. तसेच या घटनेबाबत कोणाला काही सांगितले तर तरुणीला आणि तिच्या घरच्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकारानंतर घाबरलेल्या तरुणीने एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त केली आहे.

# शाळेच्या पहिल्या दिवशी फुलांचा वर्षाव, तुतारीचा निनाद अन् कार्टूनसह विद्यार्थ्यांची धमाल, लक्ष्मीबाई भाऊराव पाटीलमध्ये विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत; आकाशात फुगे सोडून जल्लोष

नगर – नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त १५ जून रोजी कापड बाजार येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. फुलांच्या वर्षावात, तुतारीच्या मंगल निनादात आणि विद्यार्थ्यांच्या आवडत्या कार्टून पात्रांच्या उपस्थितीत शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांनी आनंद, उत्साह आणि जल्लोषाचा अनोखा अनुभव घेतला. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी शाळेच्या परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. शाळेच्या प्रवेशद्वारापासूनच विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी विशेष तयारी करण्यात आली होती. विद्यार्थ्यांचे खास आकर्षण ठरलेल्या कार्टून पात्रांनी प्रवेशद्वारावर उभे राहून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आपल्या आवडत्या कार्टूनसोबत हस्तांदोलन करताना आणि छायाचित्रे काढताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.





लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे फुलांच्या वर्षावात, तुतारीच्या मंगल निनादात आणि कार्टून पात्रांच्या उपस्थितीत स्वागत करण्यात आले.

शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांचे आगमन होताच त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करण्यात आला. तुतारीच्या गजराने आणि टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आल्याने संपूर्ण परिसर उत्साहाने भारावून गेला. अनेक दिवसांच्या सुट्टीनंतर मित्र–मैत्रिणींना भेटल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येत होता.

या स्वागत समारंभासाठी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, अनिलराव साळुंके, स्कूल कमिटी सदस्य अंबादास गारुडकर, ॲड. रविंद्र शितोळे, श्यामराव व्यवहारे, माजी नगरसेवक संजय घुले, विष्णूपंत म्हस्के, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख मिनाक्षी खोडदे, स्वाती गारुडकर आदींसह पालक प्रतिनिधी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीतांच्या हस्ते आकाशात रंगीबेरंगी फुगे सोडण्यात आले. या उपक्रमामुळे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाचा संदेश उत्साहपूर्ण वातावरणात देण्यात आला.

प्रास्ताविक करताना माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे यांनी शाळेत दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि शैक्षणिक गुणवत्ता सातत्याने वाढावी यासाठी शाळा विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शाळेच्या गुणवत्तेचा सातत्याने वाढणारा आलेखही त्यांनी यावेळी उपस्थितांसमोर मांडला. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत अभ्यास, शिस्त आणि संस्कार यांचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. नवीन पुस्तके मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. वर्गात विद्यार्थ्यांचे काही हसरे व नवोदितांचे रडणारे चेहरे देखील होते. शाळेच्या पहिल्याच दिवशी आयोजित करण्यात आलेल्या या आगळ्यावेगळ्या स्वागत समारंभामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आपुलकी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता पिसाळ व प्रदीप पालवे यांनी केले.

राजेंद्र देवकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

